| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक १२२ वा | सोमवार दिनांक २० जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## धाराशिवमध्ये केंद्रीय विद्यालयाचा मार्ग मोकळा जागेचा प्रश्न निकाली : आमदार राणाजगजितसिंह पाटील



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिव येथील प्रस्तावित केंद्रीय विद्यालयाच्या स्थापनेतील सर्वात मोठा अडसर ठरलेला जागेचा प्रश्न आता निकाली निघाला आहे. त्यामुळे केंद्रीय विद्यालय सुरू होण्याचा मार्ग आता मोकळा झाला आहे. केंद्रीय विद्यालय संघटनेचे केव्हीएस पथक सोमवारी प्रस्तावित जागेची पाहणी करण्यासाठी धाराशिव येथे येणार आहे. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील दर्जेदार सीबीएसई शिक्षणाची संधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलले गेले असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मे द्र प्रधान यांच्याकडे सातत्याने आपण याबाबत पाठपुरावा करीत होतो. केंद्रीय विद्यालयासाठी आवश्यक अटी पूर्ण करण्यासाठी जिल्हा प्रशासनाशी समन्वय साधला गेला. त्यानंतर विद्यालयासाठी तात्पुरती तसेच कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असलेली प्रक्रिया आता पूर्ण झाली आहे. याशिवाय, भविष्यात केंद्रीय विद्यालयाचा कायमस्वरूपी सुसज्ज आणि अद्ययावत परिसर उभारण्यासाठी शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या निवासी वसाहतीमागील सुमारे पाच एकर शासकीय जागा उपलब्ध करून देण्याचा निर्णयही झाला आहे. संबंधित प्रस्ताव राज्य शासनामार्फत केंद्रीय विद्यालय संघटनेकडे पाठविण्यात आला आहे. त्या जागेचीही पाहणी करण्यासाठी केव्हीएसचे पथक सोमवारी धाराशिवला येणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे. उपलब्ध असलेली जमीन, तात्पुरती इमारत आणि इतर आवश्यक पायाभूत सुविधांची केंद्रीय विद्यालय संघटनेकडून तपासणी करून तसा प्रस्ताव केंद्रीय शिक्षण मंत्रालयाकडे अंतिम मंजुरीसाठी दाखल केला जाणार आहे. मंत्रालयाकडून मंजुरी मिळाल्यानंतर विद्यालय सुरू करण्याचा आदेश जारी केला जाईल. केंद्रीय विद्यालय सुरू झाल्यानंतर धाराशिव जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचे नवे पर्व सुरू होणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील सीबीएसई अभ्यासक्रम, आधुनिक शिक्षणपद्धती, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक शिक्षण, क्रीडा व सहशैक्षणिक उपक्रमांचा लाभ स्थानिक विद्यार्थ्यांना मिळणार आहे. तसेच गएए, छएएढ, छऊ-, उणएढ यांसारख्या राष्ट्रीय स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा लाभ होणार आहे. केंद्रीय व राज्य सरकारी कर्मचारी, संरक्षण दलातील कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणात सातत्य राहील तसेच

आधुनिक प्रयोगशाळा, संगणक शिक्षण, क्रीडा व सहशैक्षणिक सुविधा उपलब्ध होतील. पुणे, सोलापूर, लातूरसारख्या शहरांत शिक्षणासाठी स्थलांतराची गरज कमी होऊन पालकांचा आर्थिक भारही हलका होईल आणि

धाराशिवच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ होऊन जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळेल असा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

**जिल्हा परिषद देणार तात्पुरती जागा : आमदार राणाजगजितसिंह पाटील**

केंद्रीय विद्यालयासाठी तात्पुरत्या स्वरूपात डीआयसी रोडवरील प्रशस्त जागा आणि सुसज्ज इमारत उपल्बध करून देण्याचा ठराव नवीन जिल्हा परिषदेच्या सभागृहाने यापूर्वीच मंजूर केला आहे. डाएट इमारतीसमोरील जिल्हा परिषदेच्या प्रशालेतील प्रशस्त २५ वर्गखोल्या, सुसज्ज ग्रंथालय, एक मोठे सभागृह, वाहनतळ आणि तीन एकर जागा केंद्रीय विद्यालयास उपल्बध करून दिली जाणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

## अवैध गुटखा वाहतुक करणाऱ्यावर तामलवाडी पोलीसांची कारवाई




धाराशिव (प्रतिनिधी)- तामलवाडी पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, तामलवाडी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक आटोळे यांना तामलवाडी पोलीस ठाणे हद्दीत महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधित असलेल्या विमल पान मसाला (गुटखा)ची अवैध वाहतुक होणार असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने. तामलवाडी पोलीस ठाण्याचे पथकाने दि.१७.०७.२०२६ रोजी तुळजापूर सोलापूर हायवे माळुंब्रा गावाजवळ सापळा रचून थांबले असता पथकास मारुती सुझुकी कंपनीची स्विफ्ट मोटार कार ही येताना दिसल्याने नमुद कारला संशयावरुन थांबवून कार मधील अशोक गोरख गिते, वय २४ वर्षे, मंजरी घाट पो पाचगरी ता. पाटोदा जि. बीड यांना विचारपुस केली असता त्याने पथकास उडवा-उडवीची उत्तरे दिली. यावर पोलीसांचा संशय बळावल्याने त्यांनी कारची झडती घेतली असता एकंदरीत त्या कारमधून एकुण १,५४० केसरयुक्त विमल पान मसाला पुडे, व्ही १ तंबाखु १,६५० पुडे असा ३,०४,२२० किंमतीचा महाराष्ट्र शासन प्रतिबंधीत अन्न पदार्थ वाहून नेत असल्याचे आढळले.

यावर पथकाने नमूद गुटखा व वाहतुकीस वापरलेली कार असा एकुण ८,४१,२२० चा माल जप्त करुन नमूद गुटखा हा महाराष्ट्र शासन प्रतिबंधीत असल्याची खात्री करुन सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन अशोक गोरख गिते, वय २४ वर्षे, रा. मंजरी घाट पो पाचगरी ता. पाटोदा जि. बीड यांच्याविरुध्द भा.दं. सं. कलम- १२३, २२३, २७४, २७५ सह २६(२) (ळीं), २७(३)(व), २७(३)(श) सह वाचन कलम कलम ३०(२)(अ) कलम भंग करुन शिक्षापात्र ५९ अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ अन्वये पो.ठा. तामलवाडी येथे गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास तामलवाडी पोलीस ठाणे करीत आहे.

सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर मॅडम, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर साहेब, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी मनोहर पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय आटोळे, पोउपनि प्रदीप टेकाळे, पोह १५२३/ सुरज नरवडे, पोह/४८४ नितीन भोसले, पोना/१४२३ गोबडे, पोअ/३११ सलगर यांचे पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.

तामलवाडी पोलिसांनी नागरिकांना महाराष्ट्रात प्रतिबंधित असलेल्या गुटखा व सुगंधित तंबाखूची विक्री, साठवणूक अथवा वाहतूक याबाबत माहिती मिळाल्यास तात्काळ पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

## क्राईम न्युज

### येरमाळा बसस्थानकात सोन्याचे मंगळसुत्र चोरले

येरमाळा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- प्रमीला बळीराम गायकवाड, वय ४८ वर्षे, रा.एआटी विरुध्द दिशेला नं ०१ ट्रॅंजि रोड व्ही.टी.सी. चुनाभट्टी जि. मुंबई या दि.१४.०७.२०२६ रोजी बसस्थानक येरमाळा येथे येरमाळा ते वाशी बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेवून प्रमीला गायकवाड यांचे गळ्यातील १८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- प्रमीला गायकवाड यांनी दि.१६.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन येरमाळा पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### अवैध मद्य विरोधी कारवाई

बेंबळी (प्रतिनिधी)- पोलीस ठाण अंतर्गत सोनाली रा. सांजा ता.जि. धाराशिव ह.मु. आंबेवाडी शिवार ता. जि. धाराशिव हे दि १७.०७.२०२६ रोजी आंबेवाडी पटेल खडी केंद्राचे पाठीमागे अंदाजे २,००० किंमतीची २० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये बेंबळी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

तसेच उमरगा पोलीस ठाणे: अंतर्गत नामदेव ३६ वर्षे, रा. एकुरगा ता.उमरगा जि. धाराशिव हे दि १७.०७.२०२६ रोजी आपल्या राहत्या घराचे बाजूस अंदाजे ३,००० किंमतीची ३० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

परंडा पोलीस ठाणे: अंतर्गत वय २५ वर्षे, रा. कंडारी ता. परंडा जि. धाराशिव हे दि १७.०७.२०२६ रोजी हॉटेल सह्याद्री पापपिंपळा रोड परंडा येथे अंदाजे १०,९२० किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या ५३ सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये परंडा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

### ३० लिटर अवैध गावठी दारु जप्त

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत गोविंद वय ५४ वर्षे, रा.उजळंब ता. बसवकल्याण ह.मु. कदेर ता. उमरगा जि. धाराशिव हे दि १३.०७.२०२६ रोजी कदेर येथे व्यंकटेश नगर तांड्याकडे जाणारे रोडच्या बाजूला अंदाजे ३,००० किंमतीची ३० लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

## भूजल संवर्धनाची विद्यार्थ्यांमध्ये रुजवली जाणीव; ५५ व्या वर्धापन दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रम उत्साहात

धाराशिव,दि.१७ जुलै (जिमाका) भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा विभागाच्या ५५ व्या वर्धापन दिनानिमित्त जयप्रकाश माध्यमिक विद्यालय,रुईभर येथे विद्यार्थ्यांसाठी 'भूजल जागृती कार्यक्रम' उत्साहात आयोजित करण्यात आला.भूजल संवर्धन, पावसाच्या पाण्याचे संधारण, पाणी बचत आणि भविष्यातील जलसंकट टाळण्यासाठी प्रत्येक नागरिकाची भूमिका याविषयी विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्याचा या कार्यक्रमाचा उद्देश होता.

कार्यक्रमात वरिष्ठ भूवैज्ञानिक रविंद्र मांजरमकर यांनी विद्यार्थ्यांना भूजलाचे महत्त्व,पावसाच्या पाण्याचे संधारण,भूजल पुनर्भरण, पाणी बचतीच्या सवयी तसेच भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी प्रत्येक नागरिकाने स्वीकारावयाची जबाबदारी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. जलसंपत्तीचे संवर्धन ही काळाची गरज असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी आजपासूनच पाणी बचतीच्या सवयी अंगीकाराव्यात,असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी जिल्हा पाणी गुणवत्ता प्रयोगशाळा,धाराशिव येथील रसायनी विजयकुमार गेंदले यांनी पाण्याची गुणवत्ता,दूषित पाण्यामुळे होणारे विविध आजार आणि त्यावरील प्रतिबंधात्मक उपाययोजनाबाबत विद्यार्थ्यांशी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून संवाद साधला. विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन करत सुरक्षित व स्वच्छ पाण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले.

कार्यक्रमात वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्ट (थजढठ) चे सतीश सुर्यवंशी यांनी 'अल निनो' आणि 'ला निनो' या नैसर्गिक हवामान प्रक्रियांची माहिती देत त्यांचा भारतीय मान्सूनवर होणारा परिणाम विद्यार्थ्यांना सविस्तरपणे समजावून सांगितला.हवामानातील बदलांचा जलस्रोतांवर होणारा परिणाम लक्षात घेऊन जलसंवर्धनाचे महत्त्व त्यांनी विशद केले.

कार्यक्रमाच्या समारोपावेळी उपस्थित विद्यार्थ्यांनी जलसंवर्धनाची प्रतिज्ञा घेत जलसंपत्तीचे संरक्षण करण्याचा संकल्प केला.जयप्रकाश माध्यमिक विद्यालय,रुईभर येथील पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी कनिष्ठ भूवैज्ञानिक मनिषा डोंगरे,सहायक भूवैज्ञानिक चंद्रकांत सुरवसे,वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्टचे सतीश सुर्यवंशी,विद्यालयाचे पर्यवेक्षक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक कनिष्ठ भूवैज्ञानिक मनिषा डोंगरे यांनी केले.

## चोरीच्या ४ मोटारसायकलसह एकाला अटक




कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, कळंब पोलीस ठाणे येथे दाखल गुन्हा क्र.११५/२०१५, गुन्हा क्र.२८७/२०२६, गुन्हा क्र.२८६/२०२६, कर्नाटक पासिंगची twister मोटरसायकल असे एकुण चार मोटरसायकल या पोलीस ठाणे कळंब हद्दीतुन चोरीस गेल्याने फिर्यादी यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमुद गुन्हे नोंदवलेले आहे.

सदर गुन्हा तपासादरम्यान पोलीस अधीक्षक श्रीमती रितु खोखर, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर व कळंब उप विभागाचे सहायक पोलीस अधीक्षक श्री. संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कळंब पो. ठा. च्या पोनि- . शेख, पोलीस हवालदार अजीज शेख, जुबेर काझी, पोलीस अंमलदार- परमेश्वर कदम, अमोल माळी, यांच्या पथकाने कौशल्यपुर्ण तपास केला. यात मिळालेल्या गोपनीय माहितीच्या व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे कळंब ता. कळंब जि. धाराशिव येथील-लखन उर्फ रमेश उत्रेश्वर दळवी, यास ताब्यात घेउन त्याचे कडे चौकशी केली असता त्यांनी सदरचे गुन्हे केल्याची कबुल करुन त्याने चोरी केलेली चार मोटरसायकल असा एकुण ७०,००० किंमतीच्या नमूद चोरीच्या मोटारसायकलसह ताब्यात घेउन त्यास अटक केली असुन गुन्ह्याचा अधिक तपास चालू आहे.

## माजी नगरसेवक धावले अन् वाचला मुक्या प्राण्याचा जीव!



धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहरातील तांबरी विभागात शनिवारी सकाळी एक गाय चालत असताना खोल नालीत पडल्याची घटना घडली. घटनेनंतर परिसरातील नागरिकांनी तातडीने धाराशिव नगरपालिकेशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. मात्र, अनेक वेळा फोन करूनही प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोप नागरिकांनी केला. यामुळे संतप्त झालेल्या नागरिकांनी नगरसेवक राहुल काकडे यांच्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली.

नागरिकांच्या म्हणण्यानुसार, राहुल काकडे यांनी दहा मिनिटांत माणसं पाठवतो असे आश्वासन दिले. मात्र, सुमारे दोन तास उलटूनही गेले तरी घटनास्थळी कुठलाच कर्मचारी ना कुठला माणूस पोचलेला नाही असा आरोप स्थानिक नागरिकांनी केला. अखेर नागरिकांनी माजी नगरसेवक सोमनाथ (आप्पा) गुरव यांच्याशी संपर्क साधला. माहिती मिळताच त्यांनी तात्काळ पुढाकार घेत अवघ्या दहा ते पंधरा मिनिटांत जेसीबी घटनास्थळी पाठवली. स्थानिक नागरिकांच्या मदतीने गायीची सुखरूप सुटका करण्यात आली. त्यामुळे एका मुक्या प्राण्याचा जीव वाचला.

या घटनेनंतर नगरपालिकेच्या कार्यपद्धतीवर नागरिकांनी गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांच्या तक्रारींना वेळेत प्रतिसाद मिळत नसेल, तर नगरपालिकेची यंत्रणा नेमकी कितपत कार्यरत आहे, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित करण्यात आला.नागरिकांनी प्रतिक्रिया देताना सांगितले की, शहरात विविध विकासकामे झाल्यानंतर त्याची प्रसिद्धी सोशल मीडियावरील रीलद्वारे मोठ्या प्रमाणावर केली जाते. मात्र, प्रत्यक्ष संकटाच्या वेळी मदतीसाठी संबंधित यंत्रणा वेळेत पोहोचत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजी वाढत आहे. मुक्या प्राण्याच्या जीविताचा प्रश्न निर्माण झाल्यानंतरही तातडीने मदत न मिळाल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित होत असल्याचे त्यांनी म्हटले.दरम्यान, कोणतेही पद नसतानाही तातडीने मदतीला धावून जाऊन गायीची सुखरूप सुटका करण्यासाठी पुढाकार घेतल्याबद्दल माजी नगरसेवक सोमनाथ गुरव यांच्या कार्याचे परिसरातील नागरिकांकडून कौतुक करण्यात येत आहे.करुनही


ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## कांहींचे विचार वेगळेच दिसून येतात......

देशात सर्वच चांगले किंवा वाईट नाहीत. चांगल्याची संख्या बरी आहे मात्र त्यात असणारे वाईट मंडळीमात्र देशविरोधी कारवाय करण्यात मग्न दिसून येतात. देशात सर्वच वाईट घडते असे नाही. चांगलेही घडते त्या बाबत बोलत नाहीत. वाईटाचा प्रामुख्याने विरोधही होत नाही, केला ही जात नाही किंवा करण्याचा प्रयत्न ही कोणी करीत नाहीत, मात्र त्यांचे नेटवर्क गतीमान असते तेच भारताची एकता, एकात्मता भेदत असतात. देशात सर्वच वाइट घडते असे नाही. चांगलेही घडते. मुळात देशाचे पंतप्रधानाने अनेक देशाचा दौरा केला, असे वाटते की, त्यांनी जगच फिरले आहे. असे असताना देशाची शान व मान उंचविण्याचे कामही केले आहे. जगात भारतची शान वाढली आहे. असो, देशात पुर्वी दंगे व बॉम्बस्फोट घडत होते ते संपले आहेत. उत्तरप्रदेशातील मुख्यमंत्री यांच्या कार्यशैलीवर टिका होते, टिका करणारे कोण आहेत तर देशावर प्रेम नसणारे मंडळी दिसून येत आहे. देशात अनेक वाईट विचाराचे धुर्त मंडळीची संख्या कमी नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यापासून आहेत मात्र संख्यात्मक वाढ झाली आहे. त्यामुळे देशात सर्वच वाईट घडते याचे दर्शन मोठ्या प्रमाणात घडविले जात आहे हे देशासाठी चांगली बाब नाही. दुसरी बाजू देशातील नागरिकांनी समजुन घेतली पाहिजे. दुसरी बाजू योग्य नसेल तर आवाज उठविला पाहिजे. तसे झाले तर जनतेचा मोठ्या प्रमाणात पाठींबा मिळणार यात शंका नाही. देशविरोधी मंडळी शिव्या किंवा वाईट केवळ एका व्यक्तीला देतात. पुर्ण पक्षाला नावे ठेवत नाहीत. नावे ठेवीत नाही. एकमेव देशाचे प्रथम नागरिका नरेंद्र मोदी यांना नावे काही व्यक्ती व समाज ठेवतो ही वस्तूस्थिती आहे. वास्तविक भाजपा केंद्रात आहे. मित्रपक्षाच्या जोरावर तो भक्कम आहे. मजबुत आहे. तसा विचार केला तर मोदी नको, भाजपा नको मग कोणाच्या हाती देश द्यावयाचा! विरोधक मजबुत नाहीत. बालिशपानाचे दर्शन घडविताते. देश बारावर्षापासून एकाच्या हाती आहे. तो मजबुत आहे अशी समज आहे. यदाकदाचित ती चुकीचे असेल तर दुसऱ्या कोणाच्या हाती देश दिल्यास मजबुत राहील असे काम करणाऱ्या व्यक्ती व पक्षाचे नाव जाहिर करावे. देशात विरोधीगटाकडून ममता बॅनर्जी ह्या तर कट्टर हिंदु विरोधी आहेत. त्यांचे काम प.बंगालनमधे पाहिले आहे. त्यानंतर अखिलेश यादव, मायवती किंवा राहुल गांधी आदि नावे समोर येतात. राहुल गांधी हे सक्षम आहेत का? त्यापेक्षा इतर कोणीही असो देश अशा व्यक्तीच्या हाती सोपवावा ज्यांच्यात मजबुत ठेवण्याची क्षमता आसावी. आज जगातील घडामोडीचा विचार केला तर आहे ती स्थिती मजबुत दिसून येते. ईतरांच्या हाती देश देवुन काय घडेल हे सांगता येत नाही. त्याच प्रमाणे विद्यमान सरकार काय चुकीचे करते याचा पाडा तरी जाहीर केला पाहिजे. सध्याला बिनबुडाचे आरोप होताना दिसून येत आहेत. बारा वर्षात एक तरी मोठी चुक विरोधीकांनी शोधली पाहिजे. चुक होत नसेल तर शोधणार कोठून? चुका शोधण्याएवढे सामार्थ्य असणे आवश्यक असते. देशात जटील असणारे प्रश्नाची सोडवणुक झाली आहे. राममंदीराची उभारणी, ३७० कलम जम्मू काश्मीरातून हाटविणे, तीन तलाक, बॉर्डरवर शांतात, पाकिस्तानला जशासतसे उत्तर हे काम तर उघड दिसून येते. चीनच्या घुसखोरीस रोखू शकलो नाहीत हे जाणवत आहे. बाकी भाजपा सरकारने केंद्रात कोणती बाब चुकीची केली हे उघडे पाडावे. भारत देश भारतीयाचा आहे का पाकिस्तानचा? हे एकदा ठरवावे. या देशात हिंदुची आनादीकाळापासून वास्तव्य होती की मोगलाची? भारतीय संस्कृतीचे जागोजागी दाखले असताना ते सांगणे चुकीचे ठरत आहेत का? मुळात काही बोटावर मोजण्याइतकी मंडळी देशविरोधी काम करते. देशात काय समाधान आहे किंवा नाही याचे दाखले विरोधकांनी द्यावे तरच जनता खरे मानेल. सध्याला काही तरी फसवी बाब सांगणे योग्य नाही. बारावर्षात एकतरी मोठी चुक उघडी पडली नाही किंवा पाडली नाही हेच सत्ताधाऱ्याचे यश म्हणावे लागेल. अनेक राज्य भाजपाकडे सोपविले जात आहेत व विरोधाकांना डावलले आहे यावरून केंद्रातील सरकारला जनतेचा पाठींबा आहे हे उघड दिसून येते. जनतेला देशातंर्गत परिस्थितीची जाण आहे. देशांतर्गत प्रश्नाची उकल आहे. डोळे झाकून चालण्याचा काळ गेला. आता कोण काय करते व करीत नाही हे सहज कळून येत आहे. प्रगत देशात, प्रगत जनता आहे. त्यामुळे कोणी काही म्हटले तरी आता लबाड चालणार नाही. विरोधकांच्या हाती देश देणे नागरिकांना आवडेल का ? किंवा परवडेल का? देशात तसे पाहिले तर काही संघटन पोखरण्याचा प्रयत्न करीत आहेत. कमकुवत करण्याचा डाव आहे. केंद्र सरकार गय करीत नाही म्हणून दबून आहेत. विध्वंसकाना जर हाती संधी मिळाली तर ते निश्चित नामोनिशाण मिटविण्याची शक्यता नाकारता येत नाही. देश हा लहान नाही. देशातील जनता विचारी आहे. पुर्वीसारखी भावनिक होत नाही. देशात मुळात मजबुत असा विरोधी पक्ष नाही. त्यापेक्षाही आता संविधान काय आहे. त्यात काय समावले आहे. सिनेअभिनेता अमीरखान कसा वागत आहे. तो जसे कपडे बदलतो तसे पत्नी बदलतो. हे जनतेला कळून येत आहे. नागरिक बोलत नाहीत मात्र त्यांना कळते आहे. त्यामुळे भारताविरोधी काम करणाऱ्यांनी सावध होणे अपेक्षित आहे. आता पर्यंत यापुर्वीच्या सरकारच्या काळात चालले आता या सरकारमध्ये चालणार नाही. एक बाब लक्षात ठेवावी ती म्हणजे या देशातील शिक्षण पद्धती बदलणे आवश्यक आहे. मेकाले यांची शिक्षण पद्धतीला तिलांजली देणे अपेक्षित आहे. चुकीच्या शिक्षणापद्धतीमुळे अतिरेकी तयार होतात. देशांतर्गत बॉम्बस्फोट घडविले जावू शकतात. त्याच प्रमाणे चुकीच्या पद्धतीचा आवलंबा होताना दिसून येत आहे.

# सावलीतून पुन्हा सूर्य उगवतो...: लातूरच्या शैक्षणिक परंपरेचा पुनर्जन्म




**अग्निपरीक्षा संपली आता,**
**उजळली सुवर्णपहाट,**
**लातूरच्या यशाने पुन्हा,**
**गाठली यशाची वाट.**
**बावन्नकशी सोने जसे,**
**धग सोसून चमकते,**
**गुणवत्तेचे कमळ आता,**
**चिखलातून उमलते.**

वादळ आलं की झाडावरची पानं हलतात, पण मुळं हलत नाहीत. संशयाच्या वादळाने लातूरच्या शिक्षणविश्वाची पानं काही काळ नक्कीच हादरली होती. पेपरफुटीच्या घटनांनी केवळ एक प्रश्नपत्रिका फुटली नव्हती, तर लातूरच्या हजारो विद्यार्थ्यांच्या घामाच्या थेंबांवर आणि त्यांच्या आई-वडिलांच्या डोळ्यांतील निरागस स्वप्नांवर संशयाची धूळ बसली होती. ज्ञानपंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या शहरावर आलेल्या त्या काळ्या ढगांनी सगळ्यांनाच अस्वस्थ केले होते. मात्र, ''री-नीट''च्या निकालाने पुन्हा एकदा हे सिद्ध केले आहे की, सत्यावर काही काळ धूळ बसू शकते, पण सत्याची झळाळी कधीच मावळत नाही. लातूर पॅटर्नने आपल्या मुळाशी असलेली गुणवत्ता, प्रामाणिकपणा आणि कष्टाची ताकद पुन्हा एकदा जगासमोर मांडली आहे.

लातूर पॅटर्न म्हणजे केवळ इमारती, क्लासेस किंवा विशिष्ट संस्थांची बेरीज नाही. तो आहे हजारो विद्यार्थ्यांच्या जागलेल्या रात्रीच्या श्रमाचा, चिकाटीचा, अभ्यासाचा प्रवास, शिक्षकांच्या डोळ्यांतील दिवसा-रात्रीच्या मेहनतीची ऊर्जा आणि पालकांच्या त्यागाचे मूक अश्रू. पेपरफुटीची घटना म्हणजे ज्ञानाच्या मंदिरात पडलेली काळी सावली होती. ज्या परीक्षेच्या आरशात विद्यार्थ्यांनी आपले भविष्य पाहिले होते, त्यावर संशयाची धूळ बसली होती. पण जेव्हा पुन्हा एकदा अग्निपरीक्षा झाली, तेव्हा हे बावनकशी सोने अधिकच लकाकून बाहेर आले. सोन्यावर काळी राख पडली म्हणून ते लोखंड होत नाही, उलट आगीच्या भट्टीतून ते अधिक तेजस्वी होते, हेच लातूरच्या विद्यार्थ्यांनी पुन्हा सिद्ध केले.

एखादा गुन्हेगार किंवा काही घुसखोर संपूर्ण समाजाचे प्रतिनिधित्व करू शकत नाहीत. पण संशयाचे राजकारण करणाऱ्यांसाठी हे समजून घेणे कठीण होते. काहींनी लातूरच्या शैक्षणिक लौकिकावर चिखलफेक करण्याचा प्रयत्न केला. मात्र, लातूरच्या मातीत आणि येथील वातावरणात जी गुणवत्तेची बिजं आहेत, ती अशा बाह्य वादळांनी संपणारीनाहीत. ही यशाची गाथा फक्त गुणांची नाही; ही गाथा संयमाची आहे. जेव्हा सर्वत्र संशयाचे वातावरण होते, तेव्हा विद्यार्थ्यांनी संयम सोडला नाही. ही गाथा प्रामाणिकतेची आहे, कारण पेपरफुटीचा चिखल ज्यांनी टाकला, त्यांनी कदाचित हे विसरले होते की, प्रश्नपत्रिका चोरीला जाऊ शकते, पण ज्ञान कधीच चोरता येत नाही.

या निकालाची व्याप्ती केवळ काही निवडक विद्यार्थ्यांपुरती मर्यादित नाही. गेल्या काही दिवसापासून लातूरमधून सुमारे १,००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी वैद्यकीय शिक्षणात प्रवेश मिळवत आहेत. या कठीण काळातही एकट्या राजर्षी शाहू महाविद्यालयाचे १७३ विद्यार्थी ५५० पेक्षा अधिक गुणांच्या टप्प्यावर आहेत, तर ३७५ विद्यार्थ्यांनी ५०० पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. दयानंद, बसवेश्वर, जयक्रांती, रिलायन्स, प्रयागबाई पाटील आणि परिमल अशा जिल्ह्यातील अनेक महाविद्यालयांनी या यशात मोलाची भर घातली आहे.

आजचा निकाल म्हणजे केवळ एमबीबीएसच्या प्रवेशाची आकडेवारी नाही. हा निकाल म्हणजे त्या पालकांच्या विश्वासार्हतेचा पुनर्जन्म आहे, ज्यांनी आपल्या मुलांवर अफाट खर्च आणि त्याहून अधिक आशा पणाला लावली होती. आजच्या या निकालाने लातूर पॅटर्नची नैतिक विश्वासार्हता पुन्हा एकदा प्रस्थापित केली आहे. लातूरची शिक्षणसंस्कृती ही कोणत्या शॉर्टकटवर अवलंबून नाही, तर ती सातत्य, शिस्त आणि मेहनतीवर आधारित आहे.

पेपरफुटीच्या बदनामीने अनेक विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास डळमळीत झाला होता, त्यांना वाटले होते की कदाचित आपल्या प्रामाणिक मेहनतीची किंमत शून्य होईल. पण ''री- नीट''च्या निकालाने त्यांच्या डोळ्यांतील हरवलेला आत्मविश्वास पुन्हा परत मिळवून दिला आहे.

एका डॉक्टरच्या मागे एक शिक्षक असतो आणि त्या शिक्षकाच्या मागे आयुष्यभराचा त्याग असतो. लातूरमधील यशस्वी विद्यार्थ्यांनी हे दाखवून दिले आहे की, यशाचा खरा मार्ग हा गुणवत्तेच्या प्रयोगशाळेतूनच जातो. काही लोकांनी या प्रकरणाला जुने संदर्भ जोडून राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न केला, पण ज्ञानाची ही पंढरी अशा राजकारणापलीकडची आहे. सत्याला न्यायालयाची गरज पडते, पण गुणवत्तेला फक्त निकालाची गरज पडते; आणि लातूरने ते पुन्हा एकदा आपल्या निकालातून सिद्ध केले आहे.

वादळे येतात, धूळ उडवतात आणि आकाश झाकोळतात; पण सूर्य कायमचा हरवत नाही. लातूर पॅटर्नची ही कहाणीही अशीच आहे. काही संशयांनी त्याच्या तेजावर क्षणभर सावली टाकली होती, पण विद्यार्थ्यांच्या घामाने, शिक्षकांच्या निष्ठेने आणि पालकांच्या विश्वासाने ती सावली आता कायमची विरघळली आहे. लातूरच्या या शैक्षणिक परंपरेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे की, ही भूमी केवळ स्वप्नांचे कारखाने चालवत नाही, तर ती सत्याचे अधिष्ठान जपते. बावन्नकशी सोन्यासारखी ही परंपरा आजही तितकीच तेजस्वी आहे-कारण खरे सोने अग्निपरीक्षेनंतरच अधिक झळाळून उठते. लातूरची ही शैक्षणिक झळाळी भविष्यातही अशीच कायम राहील, यात आता कोणतीही शंका उरलेली नाही.

**फिनिक्स पक्षी राखेतून,**
**घेतो गगनभरारी,**
**लातूरच्या या वीरांनी,**
**सिद्ध केली ती स्वारी.**
**गैरव्यवहाराची सावली,**
**क्षणभंगुर ती ठरली,**
**परिश्रमाची अमर ज्योत,**
**पुन्हा एकदा उजळली.**



**राहूल हरिभाऊ इंगळे-पाटील**
**मोबाईल ९८९०५७७१२८**

## घरच्या घरी बनवा बनारसची स्पेशल टोमॅटो चाट

चटपटीत पदार्थ आवडणाऱ्यांसाठी बनारसची प्रसिद्ध टोमॅटो चाट हा एक उत्तम पर्याय आहे. आंबट, गोड आणि तिखट चवीचा सुंदर संगम असलेली ही चाट उत्तर भारतातील लोकप्रिय स्ट्रीट फूडपैकी एक मानली जाते. बनारसच्या प्रत्येक गल्लीत मिळणारी ही चाट आता तुम्ही अगदी सहज घरच्या घरीही तयार करू शकता. कमी साहित्य, कमी वेळ आणि भन्नाट चव यामुळे ही रेसिपी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडते.

टोमॅटो चाट ही केवळ चविष्टच नाही, तर टोमॅटो आणि उकडलेल्या बटाट्यामुळे पौष्टिकही आहे. घरात अचानक पाहुणे आले किंवा संध्याकाळच्या नाश्त्यासाठी काहीतरी वेगळे बनवायचे असेल, तर ही रेसिपी उत्तम ठरू शकते. विशेष म्हणजे लग्नसमारंभ, मेजवानी किंवा छोट्या पार्टीमध्येही या पदार्थाला मोठी पसंती मिळते.

बनारसमध्ये ही चाट मोठ्या तव्यावर तुपामध्ये तयार केली जाते. त्यात टोमॅटो, उकडलेले बटाटे, मसाले, हिंग, गूळ किंवा चिंचेची गोड चटणी यांचा वापर केला जातो. शेवटी त्यावर पापडीचा चुरा, बारीक शेव आणि कोथिंबीर घालून सजवले जाते. त्यामुळे तिची चव आणखी खुलते.

**टोमॅटो चाटसाठी लागणारे साहित्य :**

४ पिकलेले टोमॅटो (बारीक चिरलेले)
२ उकडलेले बटाटे
२ टेबलस्पून साजूक तूप
चिमूटभर हिंग
१ टीस्पून किसलेले आले
१ हिरवी मिरची (बारीक चिरलेली)
१ टीस्पून भाजलेल्या जिऱ्याची पूड
अर्धा टीस्पून लाल तिखट
चवीनुसार काळे मीठ
चवीनुसार साधे मीठ
२ टेबलस्पून चिंचेची गोड चटणी
सजावटीसाठी बारीक शेव
ताजी चिरलेली कोथिंबीर

बनवण्याची सोपी पद्धत :

सर्वप्रथम कढईत साजूक तूप गरम करा. तूप गरम झाल्यावर त्यात हिंग, किसलेले आले आणि हिरवी मिरची घालून हलके परतून घ्या. त्यानंतर चिरलेले टोमॅटो घालून मध्यम आचेवर सतत ढवळत शिजवा. टोमॅटो पूर्णपणे मऊ होईपर्यंत ते शिजू द्या.

यानंतर उकडलेले बटाटे हाताने कुस्करून किंवा छोटे तुकडे करून त्यात मिसळा. आता भाजलेल्या जिऱ्याची पूड, लाल तिखट, काळे मीठ, साधे मीठ आणि चिंचेची गोड चटणी घालून सर्व मिश्रण व्यवस्थित एकजीव करा.

हे मिश्रण साधारण सात ते आठ मिनिटे मंद आचेवर शिजू द्या. त्यामुळे सर्व मसाले आणि चवी एकमेकांत छान मिसळतात. चाट थोडी घट्ट झाली की गॅस बंद करा.

सर्व्ह करताना ही गरमागरम चाट कुल्हड किंवा बाऊलमध्ये काढा. त्यावर भरपूर कोथिंबीर, बारीक शेव आणि आवडत असल्यास पापडीचा चुरा घाला. यामुळे चाटची चव आणि कुरकुरीतपणा दोन्ही वाढतात.

ही चाट खाण्यास जितकी स्वादिष्ट आहे, तितकीच बनवायलाही सोपी आहे. आंबट टोमॅटो, बटाट्याचा मऊपणा, चिंचेच्या चटणीचा गोडवा आणि मसाल्यांचा तिखटपणा यामुळे प्रत्येक घास चवदार लागतो. त्यामुळे घरातील प्रत्येकजण ही चाट आवडीने खाईल.

जर तुम्हाला स्ट्रीट फूडची चव घरच्या घरी अनुभवायची असेल, तर बनारसची ही प्रसिद्ध टोमॅटो चाट नक्की करून पाहा. एकदा चाखल्यानंतर तिची चव तुम्ही सहज विसरणार नाही.




## तरुणांमध्ये ऐकू कमी येण्याचा त्रास

आजच्या धावपळीच्या जीवनात इअरफोन आणि हेडफोन हे अनेकांच्या दैनंदिन आयुष्याचा महत्त्वाचा भाग बनले आहेत. गाणी ऐकणे, फोनवर बोलणे, ऑनलाइन मीटिंग, ऑनलाइन शिक्षण किंवा मनोरंजन यासाठी इअरफोनचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.

मात्र, तज्ज्ञांच्या मते इअरफोनचा अतिवापर आणि मोठ्या आवाजात सतत ऐकण्याची सवय कानांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. यामुळे ऐकण्याची क्षमता कमी होण्याबरोबरच कानांचे गंभीर आजार होण्याचाही धोका वाढतो.

ईएनटी तज्ज्ञांच्या मते, मोठ्या आवाजामुळे कानातील नसांना इजा झाली तर ती पूर्ववत होण्याची शक्यता अत्यंत कमी असते. त्यामुळे इअरफोनचा वापर करताना विशेष काळजी घेणे गरजेचे आहे. सध्या सरकारी आणि खासगी रुग्णालयांमध्ये ऐकण्याची क्षमता कमी झालेल्या रुग्णांची संख्या वाढत असल्याचेही त्यांनी सांगितले.



# सरकारने सत्तेचा मोह सोडावा

मागणी मान्य झाल्याखेरीज उपोषण सोडणार नाही, असे म्हणत वांगचुक यांनी आंदोलनावर आपण ठाम असल्याचे स्पष्ट केले आहे. काँग्रेस, समाजवादी, आम आदमी पक्ष यांसह सर्व विरोधी पक्षांनी त्यांच्या आंदोलनाला पाठिंबा दिला आहे.

ज्येष्ठ पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांचे उपोषण २० दिवसांनंतरही सुरू राहणे ही बाब चिंताजनक म्हणावी लागेल. त्यांची प्रकृती दिवसेंदिवस क्षीण होत असल्याने आता हे उपोषण थांबणे आवश्यक ठरत आहे.

विविध राजकीय पक्षांकडून आणि सामाजिक संघटनांकडून त्यांच्या उपोषणाला पाठिंबा मिळत आहे. तथापि त्यांच्या आवाहनानंतरही वांगचुक यांनी उपोषण मागे घेण्यास नकार दिला आहे. सरकारकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने आता उपोषण मागे घेतल्यास त्यातून चुकीचा संदेश जाऊ शकतो, हे त्यांचे म्हणणे रास्तच आहे. सरकार त्यांच्या मागण्यांची दखल घेण्यास तयार नाही, यातून सरकारची ताठर भूमिकाच स्पष्ट होते. व्यक्तीशः वांगचुक



यांना स्वतःसाठी काहीच नको आहे. 'नीट' परीक्षेचा पेपर फुटल्याच्या प्रकरणाची जबाबदारी स्वीकारून केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा, या मागणीसाठी गेल्या २८ जूनपासून वांगचुक यांनी उपोषण आरंभले आहे. वांगचुक यांच्या प्रकृतीची गंभीर दखल घेत दिल्ली उच्च न्यायालयाने सरकारचे कान टोचले आहेत. प्रत्येक नागरिकाचे जीवन अनमोल आहे आणि त्यांचा जीव वाचवण्यासाठी सरकारने आवश्यक ती सर्व वैद्यकीय पावले उचलावीत, असे न्यायालयाने बजावले आहे. येत्या २० जुलै रोजी संसदेवर जाणार्या मोर्चात सर्व राजकीय विरोधी पक्षांनी सहभागी होण्याचे आव-हन ठाकरे यांच्या शिवसेनेने केले आहे. तसे झाल्यास विरोधकांची इंडिया आघाडी अद्याप एकसंध असल्याचे संकेत त्यातून मिळतील.

**चर्चेने प्रश्न सोडवा**

'नीट' परीक्षेतील उणिवा दूर करण्याची जबाबदारी सरकारची आहे. तरीही शिक्षण मंत्र्यांचा राजीनामा घेण्यास सरकार टाळाटाळ करीत आहे. सरकारची एककल्ली भूमिकाच यात दिसून येते. लोकशाहीत शांततापूर्ण निषेध हा मूलभूत अधिकार आहे; पण जेव्हा एखाद्या व्यक्तीचा जीव धोक्यात येतो तेव्हा संवाद सुरू करून तोडगा शोधणे ही सरकारची जबाबदारी आहे; मात्र २० दिवस उपोषण सुरू राहूनही सरकारकडून कोणतीही सार्वजनिक दखल घेतली न जाणे यातून सरकारचा अहंकारच व्यक्त होतो. दिल्ली उच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि दिल्ली सरकारच्या घटनात्मक जबाबदारीची आठवण करून दिली आहे. एखाद्याच्या आरोग्याबाबत चिंताजनक स्थिती उद्भवल्यानंतर त्यात न्यायालयाला हस्तक्षेप करावा लागणे हे चांगले लक्षण नाही. सरकारने हा प्रश्न प्रतिष्ठेचा करण्याचे कारण नाही. अर्थात मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी मान्य करण्यातून अपयशाची कबुली दिल्यासारखे होणार आहे, त्यातून विरोधकांना सरकारच्या विरोधात मुद्दा मिळेल, अशी भीती सरकारला वाटत असावी. धर्मेंद्र प्रधान भाजपचे ज्येष्ठ नेते आहेत. ओडीशामध्ये त्यांचा प्रभाव आहे. त्यामुळे सरकार कारवाईला तयार नसावे असे दिसते. उपोषण सुरू झाल्याबरोबर सरकारने वांगचुक यांच्याशी चर्चा केली असती, तर हे सरकार अहंकारी असल्याचा संदेश त्यातून गेला नसता. लोकशाही मूल्ये सर्रास पायदळी तुडवली जात असताना मोदी सरकारकडून तशी अपेक्षा बाळगणे व्यर्थच आहे! वांगचुक यांची गंभीर प्रकृती लक्षात घेऊन आणि न्यायालयाच्या निर्देशांचे पालन करून त्यांच्यावर वैद्यकीय उपचार करणे, त्यांचे उपोषण थांबवण्यासाठी चर्चा सुरू करणे आणि त्यांच्या मागण्यांची दखल घेऊन परीक्षा पद्धती सुधारण्यासाठी विविध उपाययोजना राबवणे, त्यासाठी निश्चित कालावधी ठरवणे याकडे सरकारला लक्ष द्यावे लागेल. २०१२ मध्ये लोकपाल विधेयकावरून अण्णा हजारे यांनी आंदोलन केले होते. तेव्हाच्या काँग्रेसच्या नेतृत्वाखालील सरकारने वाटाघाटीच्या मार्गानेच ते उपोषण थांबवले होते. मोदी सरकारने प्रधान यांच्या राजीनाम्याचा प्रश्न प्रतिष्ठेचा न करता, अहंकार बाजूला ठेवून वांगचुक यांना उपोषणापासून परावृत्त करण्यातच शहाणपण आहे.

# अपूर्ण झोपेमुळे आरोग्यच नाही नातीही बिघडतात

आजकाल तुमच्या नात्यातील कटुता तुम्हाला झोप न लागणे हे असू शकते का? जाणून घ्या संशोधन काय सांगते. आपल्यासाठी शांत झोप किती महत्त्वाची आहे याची आपल्याला जाणीव आहे, बहुतेक आरोग्य तज्ञांनी २४ पैकी ८ तास झोपण्याचा सल्ला देतात. पण काही लोकांना झोपण्यासाठी पुरेसा वेळ मिळतो. आजच्या व्यस्त जीवनात नोकरदार वर्गातील लोकांना किंवा लहान मुलांच्या मातांना झोपण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही. जे लोक ५ तासांपेक्षा कमी झोपतात त्यांच्या शरीरावर याचा काय वाईट परिणाम होतो. शरीराला उर्जेने भरणे आणि कोणत्याही प्रकारची दुखापत बरी करणे हे केवळ आवश्यक नाही तर मानसिक समस्या दूर ठेवण्याचे देखील कार्य करते.



इतकेच नाही तर नवीन संशोधनात असेही आढळून आले आहे की जर तुम्हाला आनंदी नाते हवे असेल तर रात्री पूर्ण झोप घेणे खूप गरजेचे आहे. जर्नल ऑफ सोशल अँड पर्सनल रिलेशनशिप्सच्या मते सायकोलॉजी टुडेमध्ये सांगण्यात आले आहे की जर तुम्हाला महिन्यांपासून चांगली किंवा पूर्ण झोप येत नसेल, तर त्यामुळे तुमच्यामध्ये राग निर्माण होऊ लागतो आणि त्यामुळे तुमचे लोकांशी असलेले संबंध बिघडतात. (फोटो सौजन्य :- ळडींलज्ञ)

अपुऱ्या झोपेचे परिणाम

याआधीही संशोधनात असे आढळून आले होते की झोपेची गुणवत्ता आणि कमी झोपेमुळे आपल्याला अनेक नकारात्मक परिणामांना सामोरे जावे लागते. यामुळे समस्या सोडवणे, भावनिक बुद्धिमत्ता नसणे, सतत चिडचिड होणे किंवा मूड खराब असणे यासारख्या समस्या सुरू होतात.

संशोधनात असेही आढळून आले आहे की जर तुम्ही गाढ आणि पूर्ण झोप घेतली नाही तर त्याचा तुमच्या नात्यावर नकारात्मक परिणाम होऊ लागतो आणि त्यामुळे तुमची जवळची नातेही लवकर बिघडू शकतात.

अमेरिकेतील अभ्यास काय सांगतो


अमेरिका आणि युरोपमध्ये केलेल्या या अभ्यासात ७०० हून अधिक लोकांवर संशोधन करण्यात आले आणि असे आढळून आले की झोपेची गुणवत्ता कमी किंवा खराब झाल्यामुळे त्यांच्या प्रेमसंबंधात समाधान कमी होते आणि प्रत्येक वेळी एकमेकांबद्दल नाराजी होते.इतकेच नाही

# हरिजागरणाची खरी दिशा

**अभंगवाणी , विद्यावा-चस्पती विद्यानंद**

हरिच्या जागरणा ।
जातां कां रे न ये मना ॥
कोठें पाहासील तुटी ।
आयुष्य वेंचे फुकासाठी ॥
ज्यांची तुज गुंती ।
तें तो मोकलिती अंती ॥
तुका म्हणे बरा ।
लाभ काय तो विचारा ॥

संत तुकाराम महाराजांच्या अभंगवाणीचे वैशिष्ट्य असे की, ती माणसाला केवळ देवभक्ती शिकवत नाही; तर जीवनाकडे जागृत नजरेने पाहण्याची दृष्टी देते. त्यांच्या प्रत्येक अभंगामध्ये मानवी जीवनाचे एखादे मूलभूत सत्य अत्यंत सहज, सोप्या आणि अनुभवसिद्ध भाषेत मांडलेले आहे. यांनी कधीही केवळ कर्मकांडाचा पुरस्कार केला नाही. त्यांच्या प्रत्येक शब्दामागे जीवनातील वास्तव, ईश्वरनिष्ठा, समाजहित आणि आत्मोन्नती यांचा सखोल विचार दडलेला आहे. मानवी जीवन हे क्षणभंगुर आहे. जन्म आणि मृत्यू यांच्या दरम्यानचा प्रवास किती मोठा आहे; हे कोणी सांगू शकत नाही. म्हणूनच प्रत्येक क्षण महत्त्वाचा आहे. परंतु दुर्दैवाने मनुष्य या अमूल्य वेळेचा उपयोग अनेकदा निरर्थक गोष्टींसाठी करतो. क्षणभंगुर सुखांच्या मागे धावताना तो स्वतःचे अस्तित्व, जीवनाचा उद्देश आणि आत्मिक समाधान यांचा विसर पडतो. संत तुकाराम महाराजांनी याच वास्तवाकडे अत्यंत प्रभावी शब्दांत लक्ष वेधले आहे. ते विच-रतात; ज्या हरिनामामुळे, ज्या सत्संगामुळे आणि ज्या आत्मजागृतीमुळे जीवनाला खरा अर्थ प्राप्त होतो; त्या मार्गाकडे जाण्यासाठी मन का तयार होत नाही? या अभंगामध्ये व्यक्त झालेली गुंती ही संकल्पना विशेष विचार करण्यासारखी आहे. संसार करणे हा दोष नाही;पण संसारात इतके अडकून जाणे की ईश्वर,कर्तव्य,आत्मचिंतन आणि मूल्ये विसरून जाणे;ही खरी शोकांतिका आहे. संत तुकाराम महाराज नातेसंबंधांचा विरोध करत नाहीत;तर त्यामधील अतिरेकी आसक्तीपासून सावध करतात. कारण जीवनाच्या अंतिम टप्प्यावर प्रत्येकाला एकट्यानेच प्रवास करावा लागतो. या अभंगाचा खरा अर्थ समजून घेताना आपण लक्षात घेतले पाहिजे की, हरिजागरण म्हणजे फक्त एका रात्रीचे धार्मिक आयोजन नाही. ते आयुष्यभर चालणारी अंतर्मनाची साधना आहे.



प्रत्येक विचारात सत्य, प्रत्येक कृतीत प्रामाणिकपणा, प्रत्येक नात्यात प्रेम आणि प्रत्येक श्वासात हरिनाम जागृत ठेवणे म्हणजेच हरिजागरण होय. या लेखामध्ये या अभंगातील प्रत्येक ओळीचा तात्त्विक, सामाजिक आणि आध्यात्मिक अर्थ उलगडण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे; संत तुकाराम महाराजांचे अभंग हे केवळ भक्तिरसाने ओथंबलेले काव्य नाही; तर मानवी जीवनाचा आरसा आहेत. त्यांच्या प्रत्येक अभंगात जीवनातील एखाद्या मूलभूत सत्याचे दर्शन घडते. ते उपदेश करतात, पण तो उपदेश कोरडा नसतो; तो अनुभवातून आलेला असतो. म्हणूनच त्यांच्या प्रत्येक शब्दामध्ये जीवन बदलण्याची शक्ती आहे. हा अभंगही अशाच जीवनदर्शनाचा अमूल्य ठेवा आहे. वरकरणी हा अभंग हरिजागरणाला जाण्याचे आवाहन करतो; परंतु त्याचा आशय केवळ रात्रभर भजन-कीर्तन करण्यापुरता मर्यादित नाही. या अभंगामध्ये संत तुकाराम महाराजांनी मानवी जीवनातील जागृती, विवेक, आत्मपरीक्षण, वैराग्य आणि शाश्वत लाभ यांचे गहन तत्त्वज्ञान अत्यंत सहज भाषेत व्यक्त केले आहे.

हरिच्या जागरणा । जातां कां रे न ये मना या पहिल्याच ओळीत संत तुकाराम महाराज माणसाच्या मनालाच प्रश्न विचारतात. येथे हरिचे जागरण म्हणजे फक्त मंदिरातील जागरण नव्हे; तर अंतःकरणातील जागृती आहे. मनुष्य आयुष्यभर जागा असल्याचा भास निर्माण करतो; परंतु वास्तवात तो मोह, लोभ, अहंकार, मत्सर आणि अज्ञान यांच्या निद्रेमध्ये गाढ झोपलेला असतो. हरिजागरण म्हणजे या अज्ञानरूपी झोपेतून बाहेर येणे. उपनिषदांमध्ये उत्तिष्ठत जाग्रत असा संदेश दिला आहे. त्याच संदेशाचा लोकभाषेतील आणि अनुभवप्रधान आविष्कार तुकाराम महाराजांच्या या अभंगात दिसून येतो. आजच्या काळात जागरण या शब्दाला वेगळाच अर्थ प्राप्त झाला आहे. रात्रभर मनोरंजन, मोबाईल, सामाजिक माध्यमे, व्यसन किंवा निरर्थक चर्चांमध्ये रात्र जागवण-ारा माणूस स्वतःला जागा समजतो; पण त्याचे मन जीवनाच्या खर्या उद्देशापासून दूर गेलेले असते. संत तुकाराम महाराज विचारतात की, हरिनामाच्या जागृतीकडे, आत्मजागृतीकडे आणि विवेकाच्या प्रकाशाकडे जाण्यासाठी मन का तयार होत नाही?

कोठें पाहासील तुटी । आयुष्य वेंचे फुकासाठी या ओळीत संतांनी मानवी जीवनातील सर्वांत मोठी शोकांतिका उघड केली आहे. मनुष्य सतत वेळ नाही, संधी नाही, पैसा नाही, परिस्थिती योग्य नाही; अशा कारणांची यादी तयार करत असतो. परंतु निरर्थक गोष्टींसाठी त्याच्याकडे भरपूर वेळ असतो. आयुष्य हे परमेश्वराने दिलेले अमूल्य दान आहे. ते क्षणाक्षणाने कमी होत असते. प्रत्येक दिवस आयुष्याच्या भांडारातून कमी होणारा दिवस आहे. तरीही माणूस त्याचा उपयोग आत्मविकासासाठी न करता क्षुल्लक गोष्टींमध्ये खर्च करतो. भगवद्गीतेमध्ये श्रीकृष्ण अर्जुनाला सांगतात की मनुष्याने आपल्या जीवनाचा उपयोग आत्मोन्नतीसाठी केला पाहिजे. संत तुकाराम महाराज हाच संदेश सामान्य जनतेला सोप्या भाषेत देतात. आयुष्याचा प्रत्येक क्षण हा एक बीजासारखा आहे. योग्य जमिनीत पेरला तर त्यातून वटवृक्ष निर्माण होतो; परंतु तोच क्षण **(क्रमशः उद्याच्या अंकात)** निष्काळजीपणे वाया घालवला तर पुन्हा

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

चेरी, ब्लॅकबेरी, ब्लॅककरंट, क्रॅनबेरी, रसबेरी, द्राक्ष, ऑबरगेन आणि लाल पत्ताकोबी यांच्यात आढळणाऱ्या अँथोसायनिनचा उपयोग होऊ शकतो.

**ॲफ्रोडिजियाक म्हणजे काय?**



अफ्रोडाईट या नावावरून अफ्रोडिजियाक हे नाव प्रचलित झालं. त्यांची विभागणी तीन भागात होऊ शकते. ते म्हणजे, कामेच्छा जागृत करणारे, संभोगक्षम आणि लैंगिक सुखकारक. पण खरंच अफ्रोडिजियाकमुळे लैंगिक क्षमतेत वाढ होते की नाही हे वैज्ञानिकरीत्या सिद्ध होऊ शकलेलं नाही.लैंगिक आरोग्याचे तज्ज्ञ असलेले डॉ. क्रिचमन सांगतात, अफ्रोडिजियाक आहार घेणाऱ्या व्यक्तींना फक्त ते काम करत असतील असा विश्वास असतो.

## २ Joke विनोद




आईने सोनूला विचारले, ङ्गतू इथे ठेवलेली बिस्किटे खाल्लीस का?फ सोनू म्हणाला, ङ्गमी एकाला हात लावला नाही.फ तेव्हा आई म्हणाली, ङ्गइथे तर एकच शिल्लक आहे.फ ङ्गत्यालाच मी हात लावला नाही.फ सोनू म्हणाला.

## ३ Message संदेश



FARHAN & RANCHO
scooty pe Ghumne gaye..
Achanak RANCHO Urr gaya
Q?
Qki
Behti Hawa sa
tha w0
Urti Patang
sa tha W0
Ab Msg Padhna Band Karo Or
RANCHO kahan gaya usey DHUNDO...

## ४ Thought सुविचार




विज्ञानात आत्मज्ञान आले तर सर्वोदय होईल.

– विनोबा भावे

**संस्कृत सुभाषित**

**अधनाद्धि निर्वन्तते ज्ञातय: सुहृदो द्विजा :**
**अपुष्पाद्फलाद्वृक्षाद्यथा कृष्ण पतत्रिण:॥**
**(उद्योगपर्व, अध्याय ७२, ोक २० महाभारत)अर्थ :** ज्याप्रमाणे पक्षी पुष्परहित व फलरहित वृक्षाचा त्याग करतात, त्याप्रमाणे दरिद्री मनुष्याचे नातलग व इष्टमित्र त्याला सोडून जातात.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. मिठाई तयार करणारा
३. ज्वारीची वाळलेली ताटे, गाय-बैलाचे खाद्य
५. सवाद्य, गाजावाजा करीत
९. सुमारे दोन मैल
११. भांडणे सोडविणारा मध्यस्थ
१३. तंबूवजा घर
१४. रसपूर्ण, रसाळ
१७. लोकनाट्यातील कलाकार
१९. हिंदीत प्रवास
२१. दरवाजा
२२. पाताळ
२४. बोकड
२६. कोवळी फांदी
२७. हिमालय सर करणारा शेर्पा
२८. द्रव्य, किंमत
३०. न्हाव्याची हत्याराची पिशवी, पडशी
३२. युद्धातील वीरश्रींची घोषणा
३५. समुद्राच्या लाटांचा आवाज
३६. गीत गाणे
३७. धातुचा धागा
३८. व्यापारातील नुकसान, फटका, हादरा
३९. मोठी टोपली, फलक
४१. आयुष्य
४३. घर
४५. ढाक्याचे प्रसिद्ध कापड
४८. कडक व चिवट
४९. एकाक्षरी प्रश्न
५१. अघळपघळ, स्वैर
५३. हिस्सा
५४. संथपणे
५५. माफी
५६. संतोष, आनंद
५७. प्रतिबिंब दाखविणारी काच
५८. अंगावरील बारीक केस
६०. केस काळे करण्याचे साधन
६१. आवर घालणारी वादी
६२. सैल झालेले (वस्त्र)
६४. आश्चर्याने थक्क होणे
६७. लक्ष्मीपती
६८. सन्मानाची रक्कम, ७०. चांदणी
७२. धमनी
७४. गप्प बसणे
७६. इमारतीतील घर, फ्लॅटला मराठी शब्द
७८. हत्तीच्या गंडस्थळातून वाहणारा स्राव
७९. दागदागिने
८०. रड्या मनुष्य

### उभे शब्द

१. सहस्रवेळा
२. चणचण
४. लहान मुलांची गाणी
५. भांडणे, चर्चा
६. शोध
७. गालाची बाजू
८. तात्पर्य, अर्थ, सार
१०. सदोदित
१२. आठवड्याचा दिवस
१५. अखेरीस
१६. विष्णूचा एक अवतार
१८. श्रीमंत
२०. विहीरीतून पाणी काढण्याचे यंत्र
२३. समुद्र
२४. तोंड खाली घातलेला
२५. सततचे नामस्मरण
२९. प्रेम, माया
३१. समीक्षक
३३. सीमा
३४. जयपराजय
३६. कपाळ फुटणे
४०. हिंमत
४२. समुद्रातील अग्नी
४४. निराश
४५. फुलेफळे यांचे शेत
४६. युद्ध
४७. प्रेम, माया, लाड
४८. पुष्कळ
५०. भर दिवसा
५२. जास्तीत जास्त व कमीत कमी
५४. तात्पर्य
५६. अखंडीतपणा
५७. आंब्यातील द्रव
५९. देश, जमीन
६३. फळातील मगज
६५. अवधान, लक्ष
६६. ठेकेदार
६९. टक्कर
७१. फळातील द्रव
७२. होकारच्या विरुद्ध
७३. सहाय्य
७४. मजा, गंमत
७५. मेहरबानी
७७. मेहरबानी
७७. दुःख, खेद, सल
७८. लुसलुशीत

### आडवे उत्तरे

१.हलवाई ३.कडबा ५.वाजतगाजत ९.कोस ११.लवाद १३.पाल १४.रसवान १७.तमासगीर १९.सफर २१.दार २२.रसातल २४.अज २६.डहाळी २७.तेनसिंग २८.दाम ३०.धोपटी ३२.हर हर महादेव ३५.गाज ३६.कवन ३७.तार ३८.दणका ३९.पाटी ४१.जीवन ४३.गेह ४५.मलमल ४८.वातड ४९.का ५१.मोकळाढाकळा ५३.वाटा ५४.सावकाश ५५.क्षमा ५६.समाधान ५७.आरसा ५८.लव ६०.कलप ६१.लगाम ६२.ढगळ ६४.चकित ६७.रमावर ६८.मानधन ७०.तारका ७२.नस ७४.मौन ७६.सदनिका ७८.मद ७९.रकमपात ८०.रडतराऊत

### उभे उत्तरे

१.हजारदा २.वानवा ४.बालगीत ५.वाद ६.तपास ७.गालफड ८.तथ्य १०.सतत १२.वार १५.सरतेशेवटी १६.नरसिंह १८.मालदार २०.रहाटगाडगे २३.सागर २४.अधोवदन २५.जप २९.ममता ३१.टीकाकार ३३.हद्द ३४.हारजीत ३६.कपाळमोक्ष ४०.धमक ४२.वडवानल ४४.हताश ४५.लढाई ४७.लळा ४८.वारेमाप ५०.दिवसाढवळ्या ५२.कमालकिमान ५४.सार ५६.सलगता ५७.आमरस ५९.वतन ६३.गर ६५.भान ६६.मुकादम ६९.धडक ७१.रस ७२.नकार ७३.मदत ७४.मौज ७५.कृपा ७७.खंत ७८.मऊ




## थोडक्यात/ संक्षिप्त

### लॉर्ड्सच्या ३८७ रन्सना गंभीर-आगरकर जबाबदार!

लंडन–इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या वनडे सामन्यात टीम इंडियाच्या बॉलर्सनी सपशेल शरणागती पत्करली आहे. पहिले बॅटिंग करणाऱ्या इंग्लंडने ५० ओव्हरमध्ये ३८७३ एवढा स्कोअर केला. इंग्लंडकडून बेन डकेटने सर्वाधिक १४१ रन केले, तर जेकब बेथलने ९१ रनची खेळी केली. याशिवाय जो रूट ९१ रनवर नाबाद राहिला. तर जॉस बटलरने १३ बॉलमध्ये नाबाद ४१ रन केले. भारताकडून प्रसिद्ध कृष्णाला २ आणि प्रिन्स यादवला १ विकेट मिळाली.
लॉर्ड्सच्या मैदानातला वनडे क्रिकेटच्या इतिहासातला हा सर्वाधिक स्कोअर आहे. याआधी १९७५ साली इंग्लंडने टीम इंडियाविरुद्धच या मैदानात ३३४४ एवढा स्कोअर केला होता. या सामन्यात गुरनूर ब्रार हा टीम इंडियाचा सगळ्यात महागडा बॉलर ठरला. ब्रारने १० ओव्हरमध्ये तब्बल ९७ रन दिले, पण त्याला एकही विकेट मिळाली नाही. याशिवाय अर्शदीपने १० ओव्हरमध्ये ७२ रन, प्रसिद्ध कृष्णाने १० ओव्हरमध्ये ६९ रन आणि अक्षर पटेलने १० ओव्हरमध्ये ६१ रन दिले.
मागच्या महिन्याभरामध्ये टीम इंडियाची कामगिरी अत्यंत निराशाजनक झाली आहे.

### गावसकरांच्या करिअरला दाग, त्या मॅचचा रेकॉर्डही आज तुटला, लॉर्डसवर गंभीरच्या टीमने नाक कापले

–ऐतिहासिक लॉर्डसच्या मैदानावर इंग्लंड टीमने टीम इंडियाच्या बॉलर्सची धुलाई करून ३८७ धावा ठोकल्या आहेत. लॉर्डसच्या मैदानावरचा हा आतापर्यंतच कोणत्याही टीमने केलेला सर्वाधिक स्कोर आहे.हा स्कोर करून इंग्लंडने टीम इंडियाचे दिग्गज क्रिकेटपटू सुनील गावसकर यांच्या करिअरवरचा दाग पुसला आहे. पण गावसकर यांच्या करिअरवरचा दाग जरी पुसला गेला असला तरी लॉर्डसवर गंभीरच्या टीमने घाणेरडी कामगिरी केली आहे. त्यामुळे आता गंभीरच्या टीमने नाक कापलं आहे.इंग्लंडच्या टीमने टॉस जिंकून बॅटींगचा निर्णय घेतला होता. इंग्लंडकडून बेन डकेट आणि जेक बेथेलने डावाची चांगली सूरूवात केली होती. दोघांनी मिळून पहिल्या विकेटसाठी १९२ धावांची पार्टनरशीप केली होती. या पार्टनरशीपनंतर जेकब बेथेल ९१ धावांवर बाद झाला होता.त्यानंतर जो रुट मैदानात आला होता.त्यात ओपनिंगला आलेला बेन डकेट पुर्ण ५० ओव्हर खेळेल असे वाटत होते. पण सरते शेवटी तो १४१ धावांवर बाद झाला. १३५ बॉलमध्ये ही खेळी केली होती.

### इंग्लंडचा क्रिकेटच्या पंढरीत विश्वविक्रम

दिल्ली–क्रिकेटच्या पंढरीत इंग्लंड संघाने ऐतिहासिक धावसंख्या उभारली आहे. भारत आणि इंग्लंड यांच्यात तीन सामन्यांच्या वनडे मालिकेतील तिसरा आणि निर्णायक सामना खेळवला जात आहे.
या सामन्याची नाणेफेक जिंकत इंग्लंडने जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला आणि हा निर्णय योग्य असल्याचं फलंदाजांनी सिद्ध केलं. इंग्लंडने लॉर्ड्सच्या मैदानावर ३८७ धावांची विश्वविक्रमी धावसंख्या उभारली.इंग्लंड संघाने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकांत ३ बाद ३८७ धावा केल्या आहेत. यासह भारताला अखेरचा वनडे सामना जिंकत मालिका विजयासाठी ३८८ धावा करण्याचं आव्हान दिलं आहे. बेन डकेट व जेकब बेथल यांनी संघाला विक्रमी सुरूवात करून दिली, त्यानंतर डकेटने शतक झळकावलं. तर जोस बटलर व जो रूट यांनी कमालीचा शेवट करून दिला.
क्रिकेटच्या पंढरीत म्हणजेच लॉर्ड्सच्या मैदानावर वनडे क्रिकेटमध्ये सर्वोच्च धावसंख्या रचणारा इंग्लंड हा जगातील पहिला संघ ठरला आहे. याशिवाय लॉर्ड्सच्या मैदानावर इंग्लंडसाठी सर्वोच्च वैयक्तिक धावसंख्या बेन डकेटने रचली आहे. बेन डकेटने या सामन्यात १४१ धावांची खेळी साकारली आहे.

### लॉर्ड्सवर बेन डकेटची ऐतिहासिक खेळी

लॉर्ड्स–ऐतिहासिक लॉर्ड्स मैदानावर भारत विरुद्ध इंग्लंड यांच्यात तिसरा एकदिवसीय सामना सुरु आहे. या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडच्या संघाने धावांचा डोंगर रचत इतिहास केला आहे. इंग्लंडने भारतासमोर मालिका विजयासाठी ३८८ धावांचा लक्ष्य ठेवलं आहे. इंग्लंडसाठी सलामीवीर बेन डकेटने शानदार कामगिरी केली आहे. त्याने १४१ धावांची ऐतिहासिक खेळी करून एक नवीन विश्वविक्रम प्रस्थापित केला.
इंग्लंडने लॉर्ड्सवरील एकदिवसीय क्रिकेटमधील सर्वोच्च धावसंख्याही नोंदवली. इंग्लंडने ५० षटकांत तीन गडी गमावून ३८७ धावा केल्या. आता भारतासमोर मालिका जिंकण्यासाठी ३८८ धावांचे लक्ष्य आहे. दरम्यान, आता या सामन्यात भारतीय फलंदाज कशी कामगिरी करतात याकडे लक्ष असेल.
इंग्लंडची लॉर्ड्सवरची सर्वाधिक वनडे धावसंख्या ठरली आहे. यापूर्वी इंग्लंडने भारताविरुद्ध याच मैदानात १९७५ मध्ये ४ विकेट गमवून ३३४ धावा केल्या होत्या. आता हा विक्रम मोडीत निघाला आहे. बेन डकेटने इतिहास रचला, सर्वात मोठी खेळी खेळली इंग्लंडसाठी, बेन डकेट आणि जेकब बेथेलने ३०.१ षटकांत १९२ धावांची सलामीची भागीदारी केली.
लॉर्ड्सवरील एकदिवसीय क्रिकेटमधील ही सर्वोच्च सलामीची भागीदारी आहे.

# फुटबॉल विश्वचषकात कोण मारणार बाजी?




दिल्ली–फुटबॉल विश्वचषकाचा फायनलचा सामना आहे आणि गतविजेते अर्जेंटिना आणि स्पेन २०२६ च्या फिफा विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात एकमेकांसमोर उभे ठाकतील. उपांत्य फेरीत फ्रान्सला २–० ने हरवून स्पेनने अंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले, तर अर्जेंटिनाने इंग्लंडला २–१ ने हरवून सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरीत प्रवेश केला. लिओनेल मेस्सीच्या नेतृत्वाखाली अर्जेंटिनाने कतारमध्ये खेळला गेलेला २०२२ चा फिफा विश्वचषक जिंकला होता. आता, दोन्ही संघ विश्वचषक ट्रॉफीसाठी भिडतील आणि चाहत्यांना एक रोमांचक सामना पाहायला मिळणार आहे.
आता सोशल मिडियावर एक व्हिडिओ व्हायरल होत आहे यामध्ये एक प्रसिद्ध ऑक्टोपस पॉल याने फायनलच्या सामन्याची भविष्यवाणी केली आहे.
ऑक्टोपस पॉलने केली भविष्यवाणी
सोशल मिडियावर एक व्हिडिओ आगामी सामना स्पेन विरुद्ध अर्जेंटिना या सामन्याची भविष्यवाणी केली आहे. यामध्ये एक ऑक्टोपस आहे, तो फीफा विश्वचषकाच्या सामन्याची भविष्यवाणी करतो. यामध्ये आता त्याने फायनलच्या सामन्याची भविष्यवाणी केली आहे. व्हिडिओमधील ऑक्टोपस पॉल याच्यासमोर दोन्ही म्हणजेच स्पेन आणि अर्जेंटिना या देशाचे झेंडे आहेत आणि यामध्ये ऑक्टोपस पॉलला प्रश्न करण्यात आला आहे की फीफा विश्वचषकाचे विजेतेपद कोणाच्या नावावर होणार तर त्याने उत्तर हे दिले आहे की स्पेन हा या विश्वचषकामध्ये चॅम्पियन होणार आहे. सध्या हा व्हिडिओ सोशल मिडियावर व्हायरल होत आहे. पण मागील दोन सामन्याचा ऑक्टोपसचा अंदाज चुकला होता.
कधी आणि कुठे होणार सामना?
अर्जेंटिना आणि स्पेन यांच्यातील फिफा विश्वचषक २०२६ चा अंतिम सामना सोमवार, २० जुलै रोजी भारतीय प्रमाणवेळेनुसार मध्यरात्री १२.३० वाजता सुरू होईल. या दोन संघांमधील विजेतेपदाचा सामना न्यूयॉर्कमधील न्यू जर्सी स्टेडियमवर खेळला जाणार आहे. भारतात, फिफा विश्वचषक २०२६ चा अंतिम सामना युनाईट८ स्पोर्ट्स चॅनल्सवर टीव्हीवर थेट प्रक्षेपित केला जाईल. तुम्ही हा सामना हिंदी आणि इंग्रजी दोन्ही भाषांमध्ये थेट पाहू शकता. तुम्ही झी५ ॲप आणि वेबसाइटवरही हा सामना थेट स्ट्रीम करू शकता. मात्र, झी५ वर सामना थेट पाहण्यासाठी तुम्हाला सबस्क्रिप्शनची आवश्यकता असेल.२०१० च्या विजेत्या स्पेनने स्पर्धेच्या अंतिम फेरीपर्यंतच्या प्रवासात उपांत्यपूर्व फेरीत बेल्जियमविरुद्ध फक्त एकच गोल स्वीकारला आहे, तर दुसरीकडे अर्जेंटिनाने या स्पर्धेत आतापर्यंतच्या सात सामन्यांमध्ये सर्वाधिक १९ गोल केले आहेत. ही लढत केवळ दोन संघांमध्येच नाही, तर दोन वेगवेगळ्या फुटबॉल शैलींमध्येही आहे. अर्जेंटिनाने संपूर्ण स्पर्धेत दबावाच्या क्षणांवर मात करून विजय मिळवला आहे, तर स्पेनने चेंडूवरील नियंत्रण, मजबूत बचाव आणि सांघिक खेळाच्या जोरावर अंतिम फेरी गाठली आहे. स्पेनने उपांत्य फेरीत विजेतेपदाचे दावेदार किलियन एमबाप्पेच्या फ्रान्सला २–० ने पराभूत करून दाखवून दिले आहे की, तो कोणाच्याही प्रभावाला घाबरणारा संघ नाही.

## रोहित शर्माचं दिमाखदार शतकी खेळीसह प्रत्युत्तर पण भारतीय संघाच्या पदरी पराभव



धावांची टांकसाळ ठरलेल्या लढतीत डावखुरा वेगवान गोलंदाज सॅम करन किमयागार ठरला. वर्ल्डकपसाठी तुझा विचार होणार नाही असं निवडसमितीने रोहित शर्माला सांगितलं अशा बातम्यांच्या पार्श्वभूमीवर झालेल्या लॉर्ड्स वनडेत हिटमॅनने शतकी खेळीसह चोख प्रत्युत्तर दिलं. मात्र रोहितची शतकी खेळी भारतीय संघाला विजय मिळवून देऊ शकली नाही. इंग्लंडने उभारलेल्या ३८७ धावांच्या डोंगरासमोर खेळताना रोहित शर्मा आणि चेसमास्टर विराट कोहली हे भारताचं आशास्थान होतं. रोहितने शतक तर विराटने अर्धशतकासह आटोकाट प्रयत्न केले मात्र बाकीच्यांची साथ नसल्याने लक्ष्य दूर राहिलं. भारतीय संघाने ३६० धावा केल्या आणि इंग्लंडने २७ धावांनी विजय मिळवला. या विजयासह इंग्लंडने तीन सामन्यांची मालिका २–१ अशी जिंकली.
३८७ धावांच्या लक्ष्यासमोर खेळताना रोहित शर्मा आणि शुबमन गिल यांनी आक्रमक सुरुवात केली. गिलने पुढाकार घेत चौकार वसूल केले. रोहित सुरुवातीला चाचपडत होता. मात्र लय मिळाल्यानंतर त्याने ठेवणीतले फटके बाहेर काढले. रोहित–शुबमन जोडीने १४७ धावांची भागीदारी करत मोठ्या धावसंख्येचा पाया रचला. दुखापतीमुळे गिलला उपचारही घ्यावे लागले. आदिल रशीदने गिलला चकवलं. त्याने ७७ धावांची खेळी केली. यानंतर विराट कोहली–रोहित शर्मा ही अनुभवी जोडी जमली. त्यांनी दुसऱ्या विकेटसाठी ११३ धावांची मॅरेथॉन भागीदारी केली. ही जोडी जमताच इंग्लंडच्या तंबूत चिंता दिसू लागली.
पायात गोळे येत असतानाही रोहितने मनमुराद फटकेबाजीला सुरुवात केली. भागीदारीदरम्यान रोहितने वनडे कारकिर्दीतलं ३४वं शतक साजरं केलं. इंग्लंडमध्ये वनडेत सर्वाधिक शतकं झळकावणारा (८) विदेशी फलंदाज ठरला. लॉर्ड्सच्या ऐतिहासिक मैदानावर वनडेत शतकी खेळी साकारणारा रोहित पहिलाच भारतीय फलंदाज ठरला. लॉर्ड्सच्या ऑनर्स बोर्डवर रोहितचं नाव झळकलं. रोहित बाद होताच विराटने आक्रमक पवित्रा स्वीकारला. इशान किशनने फटकेबाजीला सुरुवात केली मात्र सॅम करनच्या स्लोअरवनने त्याची खेळी संपुष्टात आणली. अवघ्या काही मिनिटांत श्रेयस अय्यरही तंबूत परतला आणि भारताच्या विजयाच्या आशा मावळल्या. करनने विराट कोहलीला बाद करताच भारतीय चाहत्यांच्या उरल्यासुरल्या आशाही मावळल्या. कोहलीने ७४ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. आठ चेंडूंच्या अंतरात करनने भारताच्या डावाला खिंडार पाडत इंग्लंडच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. श्रेयस अय्यर भोपळाही फोडू शकला नाही. राहुल जोफ्रा आर्चरच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत झाला. अक्षर पटेल २ धावा करून माघारी परतला. भारतीय संघाने ३६० धावा केल्या. इंग्लंडतर्फे सॅम करनने ४ विकेट्स पटकावल्या.
या लढतीपूर्वी हा रोहित शर्माचा भारतासाठी शेवटचा सामना असणार अशी चर्चा होती. निवडसमितीने वर्ल्डकपसाठीच्या योजनांचा भाग नाहीस असं रोहितला सांगितल्याचं बातम्या समोर आल्या होत्या. यामुळे लॉर्ड्स वनडे रोहितचा भारतासाठी शेवटचा सामना असेल अशी अटकळ होती. मात्र बीसीसीआयचे सचिव देवजीत साईकिया यांना या वृत्ताचे खंडन केले. रोहित भारतीय संघाचा अविभाज्य भाग आहे, लॉर्ड्स वनडे रोहितचा भारतासाठी शेवटचा सामना नाही असं स्पष्ट प्रतिपादन त्यांनी केलं.
लॉर्ड्सच्या या महत्त्वपूर्ण लढतीसाठी भारतीय संघाने तीन बदल केले. गुडघ्याच्या दुखापतीमुळे जसप्रीत बुमराह खेळू शकणार नसल्याचं स्पष्ट झालं. वॉशिंग्टन सुंदर, शिवम दुबे खेळू शकणार नाहीत हे आधीच स्पष्ट झालं होतं. त्यांच्या जागी अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव आणि राहुलला संघात स्थान मिळालं. भारतीय संघाने पाच गोलंदाजांनिशी खेळण्याचा निर्णय घेतला.

## विकेट, डेड बॉल, फोर आणि बाचाबाची– टी२० सामन्यात राडा

नवी दिल्ली:टी२० सामना किती नाट्यमय ठरू शकतो याचा प्रत्यय झिम्बाब्वे–बांगलादेश लढतीच्या निमित्ताने चाहत्यांना आला. शेवटच्या षटकात विकेट, डेड बॉल, फोर असं सगळं पाहायला मिळालं आणि बांगलादेशने ४ विकेट्सनी तिसरा टी२० सामना जिंकला. या विजयासह बांगलादेशने तीन सामन्यांची मालिका २–१ अशी जिंकली. या दौऱ्यात बांगलादेशला टेस्ट आणि वनडे सीरिजमध्ये पराभवाचा सामना करावा लागला होता. टी२० मालिकेतही त्यांना विजयासाठी संघर्ष करावा लागला.
बुलावायोचं क्वीन्स स्पोर्ट्स क्लबचं मैदान. झिम्बाब्वेने बांगलादेशला १४४ धावांचं लक्ष्य दिलं. बांगलादेशने या लक्ष्याचा पाठलाग करताना चांगली आगेकूच केली. शेवटच्या षटकात बांगलादेशला ६ चेंडूत ५ धावा असं सोपं समीकरण होतं. टी२० क्रिकेटमध्ये सहज वाटावं असं लक्ष्य होतं. ब्रॅड इव्हान्सच्या पहिल्या चेंडूवर तांझिड हसनने एक धाव घेतली. दुसऱ्या चेंडूवर इव्हान्सने मोसादेक होसेनला बाद केलं. फसव्या फुलटॉसवर मोसादेक त्रिफळाचीत झाला. तिसऱ्या चेंडूवर इव्हान्सने मोहम्मद सैफुदीनला बाद केलं. ऑफस्टंपबाहेरच्या चेंडूवर मोठा फटका मारण्याच्या मोहम्मदचा प्रयत्न रायन बर्लच्या हातात जाऊन विसावला. ४ चेंडूत ४ असं समीकरण होतं.
आठव्या क्रमांकावर मेहदी हसन मिराझ फलंदाजीला आला. इव्हान्स हॅट्रिकवर होता. इव्हान्सने पुन्हा एकदा चकवणारा फुलटॉस टाकला. मेहदी हसनने आडव्या बॅटने तो खेळायचा प्रयत्न केला. एलबीडब्ल्यूसाठी अपील झालं. मात्र इव्हान्सने चेंडू टाकत असतानाच पंचांनी डेड बॉलचा इशारा केला. इव्हान्स चेंडू टाकत असताना क्षेत्ररक्षक एका जागेवरून दुसऱ्या जागी जात असल्याचं पंचांच्या लक्षात आलं त्यामुळे त्यांनी डेड बॉलचा इशारा दिला. डेड बॉल देण्यात आल्याने धाव मिळू शकली नाही आणि चेंडूचीही नोंद झाली नाही. पंचांच्या निर्णयामुळे झिम्बाब्वेचा कर्णधार सिकंदर रझा आणि गोलंदाज इव्हान्स भडकले. त्यांनी पंचांशी हुज्जत घातली मात्र निर्णय बदलला नाही. खेळ पुन्हा सुरू करण्याची सूचना पंचांनी केली.
मेहदी हसन मिराझने इव्हान्सच्या फुलटॉसवर खणखणीत चौकार लगावत बांगलादेशच्या विजयावर शिक्कामोर्तब केलं. बांगलादेशचे फलंदाज आणि इव्हान्स यांच्यात बाचाबाची पाहायला मिळाली. पंचांनी हस्तक्षेप करून प्रकरण वाढणार नाही याची काळजी घेतली.
सामन्यात काय घडलं?




झिम्बाब्वेने टॉस जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. डिऑन मेयर्सच्या ७३ धावांच्या खेळीच्या बळावर झिम्बाब्वेने १४३ धावांची मजल मारली. ब्रायन बेनेटने ४७ धावा करत मेयर्सला चांगली साथ दिली. बाकी फलंदाजांना मोठी खेळी करण्यात अपयश आलं. बांगलादेशतर्फे मोहम्मद सैफुद्दीनने २ विकेट्स घेतल्या.
बांगलादेशची सुरुवातही डळमळीत झाली. मात्र सलामीवीर तांझिड हसनने नाबाद ६६ धावांची खेळी करत बांगलादेशच्या विजयात निर्णायक भूमिका बजावली. परवेझ होसेन इमॉन आणि तौहिद हृदॉय यांनी प्रत्येकी २४ धावा करत तांझिडला चांगली साथ दिली. झिम्बाब्वेतर्फे रिचर्ड नगारावा, ब्रॅड इव्हान्स, सिकंदर रझा यांनी प्रत्येकी २ विकेट्स घेतल्या.
सिकंदर रझाचा विक्रम
झिम्बाब्वेसाठी सर्वाधिक आंतरराष्ट्रीय सामने खेळण्याचा विक्रम कर्णधार सिकंदर रझाने नावावर केला. रविवारी होत असलेला सामना सिकंदरचा झिम्बाब्वेसाठी खेळतानाचा ३१४वा सामना आहे.

# भारताच्या सर्व ४ विद्यार्थ्यांनी ऑलिम्पियाडमध्ये जिंकली सुवर्णपदके

दिल्ली–उझबेकिस्तानमधील ताश्कंद येथे १० ते १९ जुलै २०२६ दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या ५८ व्या आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र ऑलिम्पियाड (आयसीएचओ) २०२६ मध्ये भारताने उत्कृष्ट कामगिरी केली असून, भारताच्या चारही विद्यार्थ्यांनी सुवर्णपदके पटकावली आहेत.
हे विद्यार्थी आहेत:
: भुवनेश्वर, ओडिशा येथील देबदत्त प्रियदर्शी (सुवर्ण)
: मंडी गोबिंदगड, पंजाब येथील हर्षित सिंगला ( सुवर्ण )
: दिल्ली येथील कबीर चिल्लर ( सुवर्ण )
: हैदराबाद, तेलंगणा येथील संदीप कुची ( सुवर्ण )
भारताकडून चार परीक्षक सदस्य सहभागी झाले होते: प्रा. सुभजित बंडोपाध्याय – मुख्य मार्गदर्शक,डॉ. इंद्राणी सेन (एचबीसीएसइ, मुंबई) – मार्गदर्शक, डॉ. अनुबेंदू अधिकारी (आयआयटी खरगपूर) आणि डॉ. जयश्री गोपालकृष्णन (एनईएस रत्नम कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स, मुंबई) – वैज्ञानिक निरीक्षक
देशनिहाय पदक क्रमवारीत भारत चीन, व्हिएतनाम आणि वैयक्तिक सहभागी गट ब (रशिया) यांच्यासोबत संयुक्तपणे पहिल्या स्थानावर राहिला.
यावर्षीच्या आयसीएचओमध्ये ९३ देशांतील ३६३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. ही आतापर्यंतची सर्वात मोठी आयसीएचओ स्पर्धा ठरली. आयसीएचओ मधील भारताची ही सर्वोत्तम कामगिरी असून, प्रथमच भारताने सर्व सुवर्णपदके जिंकण्याचा विक्रम केला आहे.
या स्पर्धेत प्रायोगिक आणि सैद्धांतिक असे दोन्ही प्रकारचे घटक होते.
सैद्धांतिक परीक्षेत ९ प्रश्नांचा समावेश होता.



यामध्ये वनस्पतींच्या अर्कापासून तयार केलेल्या निळ्या द्रावणाची आणि कोळशाच्या खाणीतील पिवळ्या दगडाची (जो अविसेन्ना यांच्या प्रयोगशाळेतही आढळल्याचे सांगितले जाते) रचना ओळखणे; दोलायमान बीझेड अभिक्रियेचा गतिशास्त्रीय अभ्यास; विविध कार्यशील सेंद्रिय संयुगांच्या साहाय्याने छिद्रयुक्त संरचना सामग्री (सीओएफएस) तयार करणे; उर्टबुलक येथील नैसर्गिक वायूच्या आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी १९६६ मध्ये करण्यात आलेल्या ऐतिहासिक स्फोटात वापरण्यात आलेल्या युरेनियमच्या वस्तुमानाचा अंदाज लावणे; चार एकसारख्या मेदाम्ल अवशेषांचा समावेश असलेल्या चिरल कार्डिओलिपिनची (फॉस्फोएस्टरचा एक प्रकार, जो पेशींमधील पडद्याचा भाग असतो) रचना उलगडणे; मॅक्रोसायक्लिक धातू संकुलाच्या मदतीने नवीन कार्बन रूपे सायक्लोकार्बन्स स्थिर करून त्यांचा वापर नॅनो आकाराच्या आण्विक पट्ट्या तयार करण्यासाठी करणे; संक्रमण धातू उत्प्रेरकांच्या साहाय्याने अमोनिया उत्पादन केंद्रांमध्ये नायट्रोजन स्थिरीकरण; कार्यक्षमता वाढवण्यासाठी प्रकाशसंवेदी घटकांचा वापर करून वातावरणातील सीओटूचे उत्प्रेरकाद्वारे अपचयन; तसेच सायक्लोडेक्स्ट्रिनच्या कृत्रिम अनुरूप संयुगांच्या अभिक्रियांचा समावेश होता. या प्रश्नांद्वारे विद्यार्थ्यांची त्रिमितीय रासायनिक रचना आणि विशिष्ट स्थानिक रूपांतरणे समजून घेण्याची क्षमता तपासण्यात आली.
प्रायोगिक परीक्षेत ३ प्रश्नांचा समावेश होता:
(ग) दिलेल्या (अज्ञात अभिक्रियाशील पदार्थाचा वापर करून) धातू संकुलाचे संेषण करणे आणि गुणात्मक विषण व कॉम्प्लेक्सोमेट्रिक टायट्रेशनद्वारे त्याची रचना तपासणे.
(ग) ग्लुकोज, युरिया, युरिक आम्ल, कोलेस्टेरॉलचे एस्टर आणि तेल यांसारख्या जैवरासायनिक पदार्थांच्या २० मिश्रणांची दिलेल्या ५ एन्झाइम मिश्रणांच्या साहाय्याने सूक्ष्मस्तरीय चाचण्यांद्वारे ओळख करणे.
(गग) पीएच मेट्रिक टायट्रेशनद्वारे ३ आम्ल मिश्रणांची रचना ओळखणे आणि त्यानंतर पीएच मेट्रीच्या साहाय्याने दोन निर्देशक द्रावणांचे विषण करणे. यामध्ये एक नैसर्गिक निर्देशक लाल कोबीपासून तयार केलेला होता आणि दुसरा दोन निर्देशकांचे मिश्रण होता.
विद्यार्थी आणि संपूर्ण प्रतिनिधी मंडळाचे त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल अभिनंदन करण्यात येत आहे. एचबीसीएसईच्या रसायनशास्त्र ऑलिम्पियाड कक्षाचे तसेच एचबीसीएसई येथे आयोजित अभिमुखता आणि प्रस्थानपूर्व शिबिरांमध्ये संघाची उत्तम तयारी करून घेणाऱ्या बाह्य शिक्षक आणि मार्गदर्शकांच्या समूहाचे विशेष कौतुक करावे लागेल.
आयसीएचओ स्पर्धेतील भारताचा हा २७ वा सहभाग होता. या सर्व वर्षांमध्ये भारताच्या ३२म विद्यार्थ्यांनी सुवर्णपदके, ५१म विद्यार्थ्यांनी रौप्यपदके आणि १७म विद्यार्थ्यांनी कांस्यपदके मिळवली आहेत. मागील १० सहभागांमध्ये सुवर्ण आणि रौप्य पदकांचे प्रमाण अनुक्रमे ४३म आणि ५३म राहिले आहे.
ऑलिम्पियाड कार्यक्रमाला सातत्याने भक्कम पाठिंबा देणाऱ्या राष्ट्रीय विज्ञान ऑलिम्पियाड संचालन समिती, शिक्षक संघटना आणि भारत सरकारच्या निधी पुरवणाऱ्या संस्था (डीएई, डीएसटी आणि एमओई) यांचे आम्ही आभार मानतो. या कार्यक्रमामुळे भारतीय प्रतिभेला आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रदर्शित करण्याची संधी मिळते.
सर्व विद्यार्थी आणि मार्गदर्शक २० जुलै २०२६ रोजी सोमवार सकाळी ११:३० वाजता एचबीसीएसई येथील व्ही. जी. कुलकर्णी सभागृहामध्ये अनौपचारिक संवादासाठी उपलब्ध असतील.

# लातूर जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्हा पुरवठा अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी व्यंकटेश रावलोड साहेब यांची सदिच्छा भेट



**लातूर/प्रतिनिधी:** लातूर जिल्हाधिकारी कार्यालय लातूर येथे जिल्हा पुरवठा अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी व्यंकटेश राव लोड साहेब यांच्या शी प्रत्यक्ष भेटून जिल्ह्यातील वितरण व्यवस्था व ग्राहक संरक्षण चळवळी विषयी सविस्तर चर्चा केली सध्या स्थितीतील जिल्ह्यातील ग्राहक चळवळी विषयी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत ग्राहक चळवळ कशी पोहोचता येईल यावर चर्चाही याप्रसंगी करण्यात आली यावेळी प्रांत ग्राहक संरक्षण परिषद समितीचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेश भोसले प्राचार्य डॉक्टर रामलिंग मुळे सर, जिल्हा ग्राहक संरक्षण चे सचिव सुरज भैय्या रामलिंग मुळे सर, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक श्री सुभाष घोडके साहेब ग्राहक संरक्षण चे लीगल सेलचे जिल्हाध्यक्ष राम पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी प्रांत ग्राहक संरक्षण परिषदेचे राज्य मार्गदर्शक जवळग्याचे माजी सरपंच प्राचार्य डॉक्टर रामलिंग मुळे यांच्या हस्ते रामलिंगेश्वराचा ज्ञानयात्री गौरव ग्रंथ शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात

# क्वांटम कॉम्पुटिंग, डीप टेक टेक्नॉलॉजीशी जुळवून घेण्यासाठी परिसंस्था निर्माण करणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**पुणे/प्रतिनिधी:** क्वांटम कॉम्पुटिंग आणि डीप टेक टेक्नॉलॉजीने आज संपूर्ण जगामध्ये एक मोठी क्रांती घडवून आणली आहे. या तंत्रज्ञानाने केलेल्या अफाट वाढीशी, त्याच्या वेगाशी त्वरेने जुळवून घेणे आवश्यक आहे, त्यासाठी परिपूर्ण अशी इकोसिस्टिम (परिसंस्था) निर्माण करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे झालेल्या इंटर क्शन वुईथ स्टेकहोल्डर्स फॉर फॉरमेशन ऑफ द ग्लोबल मॅन्युफॅक्चरींग हब एड फ्रंटीयर टेक इन्स्टिट्यूट कार्यक्रमात ते बोलत होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे झालेल्या इंटर क्शन वुईथ स्टेकहोल्डर्स फॉर फॉरमेशन ऑफ द ग्लोबल मॅन्युफॅक्चरींग हब एड फ्रंटीयर टेक इन्स्टिट्यूट या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कुलगुरु डॉ. सुरेश गोसावी, महाराष्ट्र राज्य 'मित्रा' चे दीपक करंजीकर, लिकॉन कॅस्टलॉयचे हर्ष गुणे, लेफ्टनंट जनरल राजेंद्र निंभोळकर, क्टीन टेक्नॉलॉजीचे विकास महाजन, बिग्रेडीयर सचिन कालिया, स्टॅटरजिक रिसर्च एड ग्रोथ फाऊंडेशनचे वरुण खंदारे, सिम्बॉयसिसच्या प्र. कुलगुरु डॉ. स्वाती मुजूमदार, माजी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. अपूर्वा पालकर, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडिस्ट्रिज एड ग्रीकल्चरचे व्यवस्थापकीय संचालक प्रशांत गिरबणे, इंडियन इस्टिटयूट ऑफ सायन्स एड रिसर्चचे प्रसन्नजित फडणवीस, पुणे विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, टाटा स्टिल लि. चे माजी उपाध्यक्ष सी. आर. कुलकर्णी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले,या तंत्रज्ञानाचा जागतिक स्तरावरील वाटा २०२४ मध्ये जवळपास २ ते ३ ट्रिलियन डॉलर्स होता, जो पुढील पाच वर्षांत सुमारे १६ ट्रिलियन डॉलर्सपर्यंत पोहोचेल. मानवी इतिहासात आपण यापूर्वी कधीही अशी गती आणि वाढ पाहिलेली नाही. त्यामुळे आपल्याला या विकासाच्या प्रवासाचा एक महत्त्वाचा भाग व्हावेच लागेल.

मुख्यमंत्री म्हणाले, संयुक्त राष्ट्रांच्या (United Nations) फ्रंटियर टेक्नॉलॉजी इंडेक्सकडे (Frontier Technology Index) पाहताना भारत यामध्ये चांगली



कामगिरी करताना दिसत आहे. आपण सध्या ३६ व्या क्रमांकावर असलो, तरी आपली गणना अपेक्षेपेक्षा सरस कामगिरी करणारे म्हणून केली जात आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून आपण या क्षेत्रात उत्तम काम करत आहोत. या तंत्रज्ञानाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी आपण करत असलेले प्रयत्न सध्या विखुरलेले आणि वैयक्तिक पातळीवर अधिक केंद्रित असले, तरी आपण या प्रयत्नांचे संस्थात्मकीकरण केले, तर संपूर्ण चित्र बदलू शकते.

आज सिलिकॉन, एआय – कृत्रिम बुद्धिमत्ता आणि क्वाँटम कॉम्पुटिंग जग बदलून टाकणाऱ्या आहेत असे सांगून ते म्हणाले, आपल्या व्यवसायाचा प्रत्येक भाग या तीन गोष्टींमुळे सकारात्मक, नकारात्मक किंवा क्रांतिकारी पद्धतीने प्रभावित होणार आहे. त्यासाठी मजबूत इकोसिस्टीम (परिसंस्था) तयार करावी लागेल अन्यथा आपण काळाच्या ओघात मागे पडू. विशेषतः उत्पादन क्षेत्रात आपली सर्वात मोठी ताकद असणारे आपले एमएसएमई उद्योग निधीची कमतरता आणि क्षमतांसह इतर अनेक गोष्टींच्या अभावामुळे या तंत्रज्ञानाचा लाभ घेऊ शकत नाहीत. सर्वांगीण विकासासाठी इकोसिस्टीम तयार करायची असेल, तर सर्वांना सहज उपलब्ध असणारे स्मार्ट सुविधा आणि प्लॅटफॉर्म्स निर्माण करावे लागतील. आणि या स्मार्ट व्यवसायांच्या गरजा पूर्ण करू शकणारे सक्षम मनुष्यबळ तयार करावे लागेल.

महाराष्ट्राला जागतिक मॅन्युफॅक्चरिंग हब बनवण्यासाठी, या तंत्रज्ञानामध्ये आपल्याला मोठ्या प्रमाणावर सर्वसमावेशकता आणावी लागेल. त्यासाठी अशा विशिष्ट तंत्रज्ञानाला समर्पित असणारी संस्था उभारणे अत्यंत आवश्यक आहे असेही त्यांनी यावेळी सांगितले.

केंद्र सरकारच्या क्वाँटम तंत्रज्ञानासंबंधीच्या योजना आधीच सुरू झाल्या असल्याचे सांगून आपण आपल्या प्रयत्नांना केंद्र सरकारच्या या उपक्रमांशी सुसंगत करणे गरजेचे आहे. त्यासाठी राज्य शासनाला या तंत्रज्ञानामध्ये काम करणाऱ्या संस्थेची गरज तीव्रतेने जाणवत आहे. 'मित्रा' या दिशेने विचार करत आहे आणि काम करत आहे. स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग आणि डीप टेकसाठी एक ठोस धोरणात्मक चौकट तयार करण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित येऊन धोरणांचे संस्थात्मक एकत्रिकरण करण्याची आवश्यकता त्यांनी यावेळी व्यक्त केली. मुख्यमंत्री म्हणाले, अधिकाधिक लोकांना याचा लाभ घेता यावा यासाठी नवीन सुविधा आणि प्लॅटफॉर्म्सच्या बाबतीत शासन गुंतवणूक करण्यास पूर्णपणे तयार आहे. मित्रा'ने ठरवल्याप्रमाणे, आपल्याला क्वाँटम कम्प्युटिंगच्या प्रशिक्षकांचा एक मोठा गट तयार करायचा आहे, जे पुढे इतरांना प्रशिक्षित करतील. पुढील दोन तीन वर्षांत क्वाँटम कम्प्युटिंग क्षेत्रात किमान पाच हजार लोकांना प्रशिक्षित करण्याचे ध्येय असल्याचेही त्यांनी सांगितले.

सध्या वेगवेगळ्या पातळीवर होत असलेले हे सर्व प्रयत्न एकत्र आणून त्यांचे संस्थात्मकीकरण केले जाऊ शकते. त्या दृष्टीने इंटरॅक्शन विथ स्टेकहोल्डर्स फॉर फॉर्मेशन ऑफ द ग्लोबल मॅन्युफॅक्चरिंग हब अँड फ्रंटीयर टेक इन्स्टिट्यूट हा खरोखरच एक उत्तम उपक्रम आहे. मुंबईमध्ये विकसित होत असलेल्या 'इनोव्हेशन सिटी' साठी शासनाने टाटा समूहाशी भागीदारी केली असून ते सध्या या इनोव्हेशन सिटीचा संपूर्ण आराखडा तयार करत आहेत. एफटीआयचा हा उपक्रम इनोव्हेशन सिटीच्या संकल्पनेशी तंतोतंत जुळणारा आहे, त्यामुळे आपण यामध्येही एकत्र काम करू शकतो, असेही त्यांनी या विषयासाठी विविध क्षेत्रातील जमलेल्या तज्ज्ञांशी बोलताना सांगितले. यावेळी उपस्थित तज्ज्ञांनी विविध क्षेत्रांमध्ये क्वाँटम तंत्रज्ञानाचा असलेला स्कोप याबद्दल चर्चा केली. हर्षवर्धन गुणे यांनी प्रास्ताविक केले, विकास महाजन यांनी आभार मानले.

# शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये दयासागर तोंडारे यांनी शैक्षणिक ऊर्जा निर्माण केली: प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे

**लातूर/प्रतिनिधी** :महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रबंधक दयासागर भुजंगप्पा तोंडारे यांनी आपल्या संपूर्ण शैक्षणिक कालखंडामध्ये शेतकरी आणि कष्टकऱ्यांच्या विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक ऊर्जा निर्माण केली असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.सोमनाथ रोडे यांनी केले.

लातूरातील गिरवलकर मंगल कार्यालयात महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्रबंधक दयासागर भुजंगप्पा तोंडारे यांचा ७५वा वाढदिवस (अमृत महोत्सव) उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला यावेळी ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी



महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष ड.सांबप्पा गिरवलकर हे होते. तर विचारमंचावर महानंदा दयासागर तोंडारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ. सोमनाथ रोडे म्हणाले की, दयासागर तोंडारे सन १९७१पासून प्रदीर्घ सेवा केली. महाविद्यालयात लिपिक पदावर रुजु झालेल्या दयासागर तोंडारे यांनी प्रशासनिक कामकाजात उल्लेखनीय कामगिरी करत, गाव-तांड्यावरील शेतकरी, कष्टकरी आणि वंचीत घटकातील विद्यार्थ्यांना मदतीचा हात पुढे करून शिक्षणाची प्रेरणा दिली. स्व-बळावर उभे राहुन समाजात सन्मानाने जगण्याचे बळ दिले. कुटूंब प्रमुख म्हणून भावडांना शिक्षण देऊन स्वावलंबी बनवले. त्यांच्या व्यक्तीमत्वातील माणुसकी हीच त्यांची खरी ओळख आहे असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

अध्यक्षीय समारोप प्रसंगी ड.सांबप्पा गिरवलकर म्हणाले की, दयासागर व त्यांच्या पत्नी महानंदा तोंडारे हे दांपत्य संस्काराची खाण असून त्यांनी त्याग, समर्पण व कामाबद्दलची तत्परता याच्या बळावर महाविद्यालयाच्या उभारणीत महत्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना जिव्हाळ्याने मदतीचा हात देऊन त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आयुष्यभर प्रयत्न केले व करत आहेत. हे कदापिही विसरता येणार नाही असे ते म्हणाले.

यावेळी महानंदा तोंडारे, सुनिता महाजन, अनिता कापसे, प्रसाद तोंडारे, सरोजनी नागुरे, अशोक तोंडारे, वृषाली भोगावकर, भक्ती तोंडारे, माजी मुख्याध्यापिका ज्योती मंगलगे, गंपुप्पा तोंडारे आणि धोंडीराज येरुळे यांनी मनोगते व्यक्त केली.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते शंकरप्पा येरुळे, माजी प्राचार्य डॉ.बी.बी. जाधव, प्राचार्य डॉ.एम.एस.दडगे, माजी मुख्याध्यापक गंगाधर बुरांडे, इंजि.राजकुमार कत्ते, नागनाथ निले, राजकुमार बिडवे, सरपंच मंगल तोंडारे, योगेश गिरवलकर, डॉ.सुरेशचंद्र चौधरी, प्रा.गोविंद घार, कपील हामणे, इंजिनियर फेरे यांच्या सह नातेवाईक आणि नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सुत्रसंचालन व आभार डॉ.राजेश विभुते यांनी केले.

# 'डॉ. मेहुल राठोड यांची वैद्यकीय क्षेत्रातील जागा कुणीच घेऊ शकत नाही!'; लातूरमध्ये विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून भावपूर्ण आदरांजली

**लातूर/प्रतिनिधी:** येथील अत्यंत सुप्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ आणि नामांकित 'एमजे हॉस्पिटल'चे संचालक डॉ. मेहुल राठोड यांचे १५ जुलै रोजी अकाली व दुर्दैवी निधन झाले. या धक्कादायक घटनेमुळे लातूर जिल्ह्यासह संपूर्ण मराठवाड्याच्या वैद्यकीय क्षेत्रावर शोककळा पसरली आहे. डॉ. मेहुल राठोड यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. लक्ष्मीरमण लाहोटी यांच्या मार्गदर्शनाखाली दयानंद सभागृहात एका शोक सभेचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी वैद्यकीय, सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांच्या आठवणींना उजाळा दिला आणि भावपूर्ण आदरांजली वाहिली. वयाच्या अवघ्या काही वर्षांच्या यशस्वी कारकिर्दीत अनेक गंभीर रुग्णांना नवजीवन देणाऱ्या एका निष्णात डॉक्टरचा असा अचानक अंत व्हावा, या घटनेने संपूर्ण शहरात तीव्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

दिवंगत प्रख्यात मधुमेहतज्ज्ञ डॉ. ईश्वर राठोड यांचे चिरंजीव असलेल्या डॉ. मेहुल यांनी वडिलांचा वैद्यकीय सेवेचा वारसा अत्यंत सक्षमपणे पुढे चालवला होता. एम.डी. (चऊ) आणि डी.एन.बी. (ऊछइ) या प्रगत पदव्यांसह १० वर्षांपेक्षा जास्त क्लिनिकल अनुभव असलेल्या डॉ. मेहुल राठोड यांनी लातूरमधील बार्शी रोड येथील एमजे हॉस्पिटलच्या माध्यमातून इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजीमध्ये एक विश्वासार्ह नाव कमावले होते.



अँजिओप्लास्टी आणि हृदयाच्या लयीचे व्यवस्थापन यांसारख्या गुंतागुंतीच्या हृदयविकारांवर जागतिक दर्जाचे उपचार स्थानिक पातळीवर उपलब्ध करून देण्यात त्यांचे विशेष प्राविण्य होते.

शोकसभेत बोलताना दयानंद शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष श्री. ललितभाई शाह यांनी एका हृदयस्पर्शी प्रसंगाची आठवण सांगितली. ते म्हणाले, वेळ अमावास्येच्या दिवशी माझी पत्नी आजारी असताना मी डॉ. मेहुल यांना फोन केला. त्यांनी क्षणाचाही विलंब न करता 'तुम्ही घरून हॉस्पिटलमध्ये पोहोचेपर्यंत मी शेतातून थेट हॉस्पिटलमध्ये येतो' असा शब्द दिला आणि तो पाळला. रुग्णाप्रती त्यांची ही बांधिलकी थक्क करणारी होती. दयानंद शिक्षण संस्थेचे सचिव श्री. रमेश बियाणी यांनी भावना व्यक्त करताना सांगितले की, दयानंद शिक्षण संस्थेचे सदस्य असलेले डॉ. मेहुल हे एक स्वप्न पाहणारे आणि ते प्रत्यक्षात उतरवणारे डॉक्टर तर होतेच, पण त्यापेक्षाही ते जनसामान्यातील अत्यंत मनमिळावू माणूस होते. रुग्णांचे दुःख आपले मानून सेवा करणारा तो एक उत्तम डॉक्टर होता. दयानंद संस्थेशी त्यांचे व त्यांच्या वडिलांचे जुने नाते होते, हा ऋणानुबंध भविष्यातही कायम राहील.

लातूरचे माजी महापौर श्री. विक्रांत गोजमगुंडे यांनी डॉ. मेहुल यांच्या कार्याचा गौरव करताना सांगितले की, कोविडच्या अत्यंत कठीण काळात डॉ. मेहुल राठोड यांच्याशी माझा ऋणानुबंध अधिक दृढ झाला. प्रत्येक पेशंटला आत्मीयतेने तपासणारा हा डॉक्टर आपल्यामधून निघून गेला आहे. ही केवळ राठोड कुटुंबाची नव्हे, तर संपूर्ण लातूर जिल्ह्याची कधीही भरून न निघणारी हानी आहे. ज्येष्ठ विचारवंत श्री. अतुल देऊळगावकर यांनी, डॉ. मेहुल हे आपल्या नावाप्रमाणेच सर्वांवर सुखाचा वर्षाव करणारे, रुग्णांशी मानवतावादी नाते राखणारे आणि चोवीस तास फोनवर उपलब्ध राहून गरजूंना आर्थिक मदत करणारे देवमाणूस होते, अशा शब्दांत त्यांच्या ख्यातीचा उल्लेख केला.

एमआयटीचे सन्माननीय सदस्य डॉ. हनुमंत कराड यांनी, डॉ. मेहुल यांच्यासारखा आदर्श विद्यार्थी आणि डॉक्टर पुन्हा होणे नाही, अशा भावना व्यक्त करत लातूरमधील कार्डिओलॉजिस्टचे एक मोठे स्वप्न अपूर्ण राहिल्याचे सांगितले. डॉ. मेहुल यांचे सासरे श्री दिगंबर मालेकर यांनी, ते अत्यंत हुशार आणि सुसंस्कारी होते, मी जेव्हा जेव्हा त्यांच्याकडे जायचो, ते नेहमी माझ्या पाया पडून आशीर्वाद घ्यायचे आणि नंतरच माझी तपासणी करायचे. त्यांचे जाणे आमच्यासाठी अत्यंत अनाकलनीय व धक्कादायक आहे, असे सांगताना जुन्या आठवणींना उजाळा दिला.

शोकसभेदरम्यान डॉ. मेहुल राठोड यांचे शेजारी श्री. निलेश ठक्कर यांनी लातूरमधील ईश्वराचा अवतार हरवला अशा शब्दांत शोक व्यक्त केला, तर श्री. जयवंतराव काथवटे यांनी सर्वांना 'काका' म्हणणाऱ्या या प्रेमळ पुतण्याला गमावल्याचे दुःख मांडले. याशिवाय श्री. हर्षवर्धन राव, श्री. प्रभू माळी, गुजराती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष श्री. कमलेश ठक्कर, रोटरी परिवारातर्फे श्री. सुनील कोचेटा आणि त्यांचे बालमित्र डॉ. संगमेश चवंडा यांनी डॉ. मेहुल यांच्या हसऱ्या आणि आश्वासक स्वभावाचा गौरव केला. डॉ. अशोक दामोसकर यांनी सांगितले की, डॉ. मेहुल यांना रुग्णाविषयी उपजत तीव्र सहानुभूती होती. केवळ रोगाचे निदान करणे म्हणजे भौतिक विकास नाही, तर माणसाचे माणूसपण महत्त्वाचे आहे, हा वारसा त्यांना वडिलांकडून मिळाला होता आणि कठोर मेहनतीच्या आधारे त्यांनी रुग्णांच्या मनाचा अभ्यास केला केला होता. वैद्यकीय क्षेत्रात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण करून गेलेल्या या महान डॉक्टरांना लातूरकरांच्या वतीने अत्यंत जड अंतःकरणाने आणि अश्रूभूर्ण नयनांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# एमटीएस स्पर्धा परीक्षेत साने गुरुजी प्राथमिक विद्यालयाची दमदार कामगिरी

**लातूर/प्रतिनिधी:** राज्यस्तरीय महाराष्ट्र टॅलेंट सर्च MTS स्पर्धा परीक्षेत साने गुरुजी प्राथमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी राज्याच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. या यशस्वी विद्यार्थ्यांचा व त्यांना घडविणाऱ्या शिक्षकांचा सत्कार समारंभ विद्यालयात उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साने गुरुजी शैक्षणिक संकुलाचे प्रशासकीय अधिकारी जी. टी. माने हे होते. प्रमुख अतिथी म्हणून संकुलाचे सचिव कालिदासजी माने, मराठवाडा विभागाचे एमटीएस समन्वयक शंभुलिंग नागुरे, पालक प्रतिनिधी पंकज मुगावे तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक पांडुरंग केंद्रे उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. प्रास्ताविकात मुख्याध्यापक पांडुरंग केंद्रे यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडत विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अभिनंदन केले.

प्रमुख अतिथी कालिदासजी माने यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांचे महत्त्व सांगत, स्पर्धा परीक्षांमधूनच भविष्यात आयएएससारखे सक्षम अधिकारी घडले पाहिजेत, असे प्रेरणादायी मार्गदर्शन केले. एमटीएस समन्वयक शंभुलिंग नागुरे यांनी विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, सातत्य आणि चिकाटीच्या बळावर प्रत्येक स्पर्धेत यश संपादन करावे, असे आवाहन केले. अध्यक्ष जी. टी. माने यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यास शुभेच्छा दिल्या.

# डॉ. दिलीप नागरगोजे यांचे इयत्ता १२ वी तत्त्वज्ञान विषयाचे १२ व्हिडिओ 'दीक्षा' पवर प्रसारित

**लातूर/प्रतिनिधी** :दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील उपप्राचार्य तथा तत्त्वज्ञान विषयाचे प्राध्यापक डॉ. दिलीप नामदेव नागरगोजे यांच्या इयत्ता १२ वी तत्त्वज्ञान विषयावरील १२ शैक्षणिक व्हिडिओंचा समावेश 'दीक्षा' (ऊखघडक-) या भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाद्वारे सुरू करण्यात आलेल्या राष्ट्रीय डिजिटल शिक्षण व्यासपीठावर करण्यात आला आहे. त्यांच्या या यशामुळे महाविद्यालयासह लातूर जिल्ह्याच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

डॉ. दिलीप नागरगोजे गेल्या ३० वर्षांपासून तत्त्वज्ञान विषयाचे अध्यापन करत असून, राज्यातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व सुलभ शैक्षणिक साहित्य उपलब्ध व्हावे या उद्देशाने त्यांनी इयत्ता १२ वी तत्त्वज्ञान विषयाच्या संदर्भात अनेक ग्रंथाचे लेखन केले आहे. इयत्ता १२ वीच्या अभ्यासक्रमाबरोबरच त्यांनी इतर ग्रंथ लिहिले आहेत. त्यातील काही ग्रंथाची राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ नागपूर व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड च्या अभ्यासक्रमास निवड झाली आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन१२ व्हिडिओंची 'दीक्षा' पवर निवड करून प्रसारित केली आहे.



'दीक्षा' पवरील या व्हिडिओंच्या माध्यमातून राज्यभरातील हजारो विद्यार्थी आणि शिक्षकांना तत्त्वज्ञान विषयाचा अभ्यास अधिक प्रभावी, सोपा आणि गुणवत्तापूर्ण पद्धतीने करता येणार आहे. डिजिटल शिक्षणाला चालना देणाऱ्या या कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

या उपक्रमासाठी दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (ऊखएढ), लातूरचे प्राचार्य डॉ. मारुती सलगर, अधिव्याख्याते श्री. अनिल जाधव व श्री. गिरीश माने, महाविद्यालयाचे पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, डॉ संदिपान जगदाळे प्रा. गोविंद मुंडे, प्रा. महेश जंगापल्ले, प्रा. इरफान शेख आणि कार्यालयीन अधीक्षक श्री. संजय व्यास यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

डॉ. दिलीप नागरगोजे यांच्या या उल्लेखनीय शैक्षणिक योगदानाबद्दल शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्या या कार्यामुळे डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अधिक सक्षम आणि गुणवत्तापूर्ण अध्ययनाची संधी उपलब्ध झाली असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.


प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटिंग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



# पोदार मध्ये नेल्सन मंडेला जागतिक दिवस मोठ्या उत्साहात साजरा




धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- पोदार इंटरनॅशनल स्कूल, धाराशिव येथे स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांच्या मार्गदर्शनाखाली नेल्सन मंडेला जागतिक दिवस मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. मानवता, सेवा, समानता, शांतता आणि समाजाप्रती जबाबदारी या मूल्यांचा विद्यार्थ्यांमध्ये जागर निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी नेल्सन मंडेला यांच्या प्रेरणादायी जीवनकार्याची, वर्णद्वेषाविरुद्धच्या त्यांच्या संघर्षाची तसेच मानवतेसाठी दिलेल्या योगदानाची माहिती देण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी भाषणे, विचार मांडणी, घोषवाक्य लेखन तसेच समाजसेवा आणि स्वच्छतेचा संदेश देणाऱ्या उपक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्वतःसाठी नव्हे तर समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा प्रत्येकाने घ्यावी, असा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला. या कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन इयत्ता पाचवी चे वर्गशिक्षक आदर्श कांबळे सर व कार्यक्रमाधिकारी सुप्रिया रायगुडे मॅडम यांनी अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने केले. तसेच याप्रसंगी शाळेचे स्कूलचे प्राचार्य डॉ. वाल्मिक सोमासे सर यांनी विद्यार्थ्यांना नेल्सन मंडेला यांच्या विचारांचे अनुसरण करून सामाजिक बांधिलकी जपण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन शाळेच्या शिक्षकांनी केले.

# आष्टाकासार मार्गावर धोकादायक वळण जीवघेणे; ना इशारा फलक, ना गतिरोधक

लोहारा -तालुक्यातील आष्टामोड ते आष्टाकासार या मार्गावरील धोकादायक वळण वारंवार अपघातांना कारणीभूत ठरत असून, या ठिकाणी तातडीने सुरक्षाविषयक उपाययोजना करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. या वळणावर आतापर्यंत अनेक गंभीर अपघात झाले असून, सहा वर्षांत आठ जणांचा मृत्यू तर २० हून अधिक जण जखमी झाल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली आहे. त्यामुळे या ठिकाणी गतिरोधक, इशारा फलक आणि अन्य आवश्यक सुविधा उभारण्याची गरज व्यक्त होत आहे.

आष्टाकासार हे गाव राष्ट्रीय महामार्गालगतचे मोठे गाव असून, महामार्गापासून सुमारे पाच किलोमीटर अंतरावर आहे. आष्टामोडपासून दीड किलोमीटर अंतरावर असलेले हे वळण अत्यंत धोकादायक मानले जाते. या मार्गावर बराच भाग सरळ असल्याने वाहनांचा वेग अधिक असतो. अचानक समोर वळण आल्याने चालकांचा अंदाज चुकतो आणि वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात घडतात. विशेष म्हणजे या ठिकाणी धोकादायक वळणाचा इशारा देणारे फलक, दिशादर्शक अथवा गतिरोधक नसल्याने अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

यापूर्वीही ग्रामस्थांनी संबंधित बांधकाम विभागाकडे निवेदन देऊन उपाययोजना करण्याची मागणी केली होती. मात्र, त्यानंतरही प्रत्यक्ष काम झाले नसल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली आहे. आता पुन्हा एकदा गावातील नागरिक आणि कै. भाऊसाहेब बाबुराव सोमवंशी सामाजिक बहुद्देशीय संस्थेच्या पुढाकाराने बांधकाम विभाग, लोहारा यांना निवेदन देण्यात येणार आहे. संस्थेचे सदस्य विवेक सोमवंशी यांनी बांधकाम विभागाशी संपर्क साधला असता, संबंधित अधिकाऱ्यांनी शासनाकडे पाठपुरावा सुरू असल्याचे सांगितले. तसेच तातडीने आपल्या अधिकारात येणारे इशारा फलक बसविण्यात येतील आणि अन्य कोणत्या सुरक्षात्मक उपाययोजना करता येतील, याचाही विचार केला जाईल, असे आश्वासन दिले. ग्रामस्थांनी या वळणावरील अपघातांची गंभीर दखल घेऊन प्रशासनाने तातडीने ठोस निर्णय घेण्याची मागणी केली आहे. वेळेत उपाययोजना झाल्यास भविष्यात होणारे अपघात टाळण्यास मोठी मदत होणार असल्याचे नागरिकांचे मत आहे.

धोकादायक वळणांच्या सर्व्हेची मागणी

आष्टामोड-आष्टाकासार मार्गावरील वळणापुरतीच ही समस्या मर्यादित नसून, लोहारा तालुक्यातील अनेक रस्त्यांवर अशाच प्रकारची धोकादायक वळणे असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. अनेक ठिकाणी रस्त्यालगत झाडे व झुडपे मोठ्या प्रमाणात वाढल्याने समोरून येणारी वाहने वेळेत दिसत नाहीत. परिणामी वाहनचालकांचा अंदाज चुकून अपघात घडतात. काही ठिकाणी इशारा फलक, रिफ्लेक्टर, रस्त्यावरील मार्किंग आणि गतिरोधकांचा अभावही जाणवतो. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाने संपूर्ण तालुक्यातील रस्त्यांचे तांत्रिक सर्वेक्षण करून धोकादायक ठिकाणांची नोंद घ्यावी, तसेच प्रत्येक ठिकाणी आवश्यक त्या सुरक्षाविषयक उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# ५% दिव्यांग निधीचा ठराव मंजूर; पात्र दिव्यांगांनाच लाभ मिळावा, प्रहारची मागणी



धाराशिव : स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत दिव्यांग बांधवांसाठी खर्च करण्यात येणारा ५ टक्के निधी गेल्या अनेक दिवसांपासून प्रलंबित होता. या निधीच्या वितरणासाठी प्रहार संघटनेने सातत्याने पाठपुरावा केला. मागील दिवाळीपासून सुरू असलेल्या या प्रयत्नांना अखेर यश आले असून, शहरातील अनेक दिव्यांग बांधवांना न्याय मिळाल्याचे संघटनेने सांगितले.

या पार्श्वभूमीवर प्रहार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी आज धाराशिव नगरपालिका येथे मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन संबंधित विषयावर सविस्तर चर्चा केली. शहरातील णऊखऊ कार्डधारक तसेच शहरी हद्दीतील पात्र दिव्यांग बांधवांनाच शासनाच्या नियमानुसार ५ टक्के निधीचे वितरण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच ग्रामीण भागातील लाभार्थी किंवा णऊखऊ कार्ड नसलेल्या व्यक्तींचा या यादीत समावेश करू नये आणि निधीचा लाभ केवळ पात्र व खऱ्या दिव्यांगांनाच मिळावा, अशी भूमिका प्रहार संघटनेने मांडली.

निधी वितरण प्रक्रियेत कोणत्याही प्रकारची अनियमितता, चुकीची बाब अथवा अपात्र लाभार्थ्यांचा समावेश आढळल्यास प्रहार संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

दरम्यान, नगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत दिव्यांगांसाठी राखीव ५ टक्के निधीच्या वितरणासंदर्भातील ठराव मंजूर झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. त्यामुळे प्रहार संघटनेच्या मागणीला मोठे यश मिळाल्याचे मानले जात आहे. लवकरच पात्र दिव्यांग बांधवांना या निधीचे वितरण करण्यात येणार असल्याने दिव्यांग नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

यावेळी प्रहार संघटनेने स्पष्ट केले की, या योजनेचा लाभ केवळ खऱ्या व पात्र दिव्यांगांनाच मिळावा. तसेच शहरातील दिव्यांग बांधवांना या संदर्भात कोणतीही अडचण असल्यास त्यांनी तात्काळ प्रहार संघटनेशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाध्यक्ष मयूर काकडे यांनी केले.

यावेळी प्रहार संघटनेचे जिल्हाध्यक्ष मयूर काकडे, शहराध्यक्ष जमीर शेख, मेहबूब तांबोळी, बालाजी तांबे, राजेश भिसे, शरद आदलिंगे, संजय शिंदे, सचिन जाधव, रशीद शेख, प्रवीण इंगळे, खांडेकर यांच्यासह मोठ्या संख्येने पदाधिकारी उपस्थित होते.

**NAME CHANGE DECLARATION**

Here in this advertise i am declaring that
i have change My Name which was :
**SHAIKH MOHAMMED QHASIM ABDUL MAJID**
**TO SHAIKH MOHAMMED QASIM ABDUL MAJID.**
Hence for this Declaration i will be known
by this name and will use . in future the
**SHAIKH MOHAMMED QASIM ABDUL MAJID .**
will used by my family husband /wife,
children and relative.
**OLD NAME :- SHAIKH MOHAMMED QHASIM ABDUL MAJID.**
**NEW NAME:- SHAIKH MOHAMMED QASIM ABDUL MAJID**
Address :- 27 / 328 पंचायत समिती मागे भाग्यनगर उस्मानाबाद धाराशिव 413501
AADHAR NO.- 404253248049
MOB:- 9881786862
PLACE : OSMANABAD DATE : 06/06/2025

# खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांचा वाढदिवस विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा

धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)- खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी धाराशिव शहरात विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य व सर्वधर्मसमभाव जपणारे उपक्रम राबविण्यात आले. दिवसभर झालेल्या या उपक्रमांद्वारे समाजातील विविध घटकांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्यात आला. वाढदिवसानिमित्त धारासुर मर्दिनी मंदिरात महाआरती व दुग्धाभिषेक करण्यात आला. खासदार राजेनिंबाळकर यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य व निरंतर जनसेवेची शक्ती लाभावी, अशी प्रार्थना यावेळी करण्यात आली.

१७ जुलै रोजी रात्री १२ नंतर जन्मलेल्या आठ नवजात मुलींच्या नावाने दामदुप्पट मुदत ठेव प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. मुलींच्या जन्माचे स्वागत आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला.

खासदार संपर्क कार्यालयात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शिवसैनिक, युवासैनिक व कार्यकर्त्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. हजरत ख्वाजा समसोद्दीन दर्ग्यात चादर अर्पण करण्यात आली. खासदार राजेनिंबाळकर यांच्या दीर्घायुष्यासाठी तसेच समाजात सौहार्द, शांतता आणि ऐक्य नांदावे, अशी प्रार्थना करण्यात आली. भारत विद्यालय, धाराशिव येथे सुमारे ५०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वितरण करण्यात आले. याशिवाय विद्यार्थ्यांना खाऊचेही वाटप करण्यात आले. जिल्हा शासकीय रुग्णालयासमोरील अन्नपूर्णा उपक्रमांतर्गत रुग्ण, त्यांच्या नातेवाईकांसह गरजू नागरिकांना भोजन देण्यात आले. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय स्त्री रुग्णालय येथे उपचार घेत असलेल्या रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना फळांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांमध्ये लोकसभा सह संपर्कप्रमुख सूरज साळुंके , सतीश सोमाणी, प्रदीप मुंडे, पप्पू मुंडे, रवी कोरे-आळणीकर, प्रशांत साळुंके, अमित उंबरे, नाना घाडगे, तुषार निंबाळकर, बप्पा उंबरे, ज्ञानदेव करवर, भीमाण्णा जाधव, काकासाहेब शिंगणारे, मोईन पठाण, ऋषीकेश पाटील, गजेंद्र जाधव, पृथ्वीराज चिलवंत, कलीम कुरेशी, मुजीब शेख, शौकत शेख, डॉ. फरीद अत्तार, छोटा साजिद, शरीफ शेख, अलीम कुरेशी, आबा देवकते, सागर कदम, शुभम पांडरे, आकाश शेंडगे, गगन आगलावे, कृष्णा मुंडे, रविकांत माळाळे यांच्यासह शिवसैनिक, युवासैनिक आणि खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्यावर प्रेम करणारे असंख्य नागरिक उपस्थित होते.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# अनाथाश्रमातील मुलांसोबत अनुभवला मायेचा ओलावा; स्नेहाच्या भेटीने विद्यार्थ्यांचे चेहरे फुलले...

# रुपाली शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त मतिमंद बालगृहातील मुलांना शालेय साहित्याचे वाटप...





मुरुम (सुधीर पंचगल्ले) -एकुरगावाडी, ता. उमरगा येथील ज्ञानदेव शिक्षण प्रसारक मंडळ, कदेर संचलित तुळजाभवानी अपंग मतिमंद अनाथ मुलांचे बालगृह येथे व्ही. व्ही.ए. फाऊंडेशनच्या संचालिका सौ. रुपालीताई शिवाजी शिंदे यांचा ४९ वा वाढदिवस अत्यंत साधेपणाने परंतु आदर्शवत पद्धतीने साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत बालगृहातील विशेष मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवत त्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संत निरंकारी मंडळाच्या सौ. मीराताई मोटे होत्या. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त प्राध्यापिका सौ. विजयाताई बेलकेरी, विद्यापीठाच्या वाणिज्य अभ्यास मंडळाचे सदस्य प्रा. डॉ. सुधीर पंचगल्ले, महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, उमरगा तालुका ग्राहक पंचायतचे संघटक धनराज शिंदे, मुख्याध्यापक गोविंद शिंदे, भारत सरकारच्या वस्त्र मंत्रालयातील सेवानिवृत्त प्रादेशिक व्यवस्थापक डॉ. शिवाजी शिंदे, व्ही.व्ही.ए. फाऊंडेशनच्या सदस्या ऐश्वर्या शिंदे, योगेश पांचाळ, सूर्यकांत कावळे, पद्मावती शिंदे, सारिका कटके, सुलभा कटके आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात केक कापून आणि शिवाजी शिंदे व सौ. रुपाली शिंदे यांचा सपत्नीक सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. त्यानंतर बालगृहातील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी प्रा. विजया बेलकेरी, डॉ. सुधीर पंचगल्ले, डॉ. महेश मोटे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सामाजिक बांधिलकी जपल्याबद्दल शिंदे दाम्पत्याचे कौतुक केले. अध्यक्षीय भाषणात मीराताई मोटे यांनी या स्तुत्य उपक्रमाचे स्वागत केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शिवाजी शिंदे यांनी केले. या उपक्रमासाठी राजेंद्र कटके, रेवण कटके, वैभव कटके, गोविंद कटके, रोहन शिंदे आदींनी विशेष पुढाकार घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर जाधव तर आभार गोविंद शिंदे यांनी मानले. या प्रसंगी परिसरातील नागरिक व बालगृहाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अनाथाश्रमातील मुलांसोबत अनुभवला मायेचा ओलावा; स्नेहाच्या भेटीने विद्यार्थ्यांचे चेहरे फुलले :**

माणुसकीच्या भावनेतून सामाजिक बांधिलकी जपताना अनाथ आश्रमातील मुलांसोबत काही क्षण घालवून त्यांना मायेचा आधार देण्याचा उपक्रम नुकताच पार पडला. तालुक्यातील एकुरगावाडी येथील तुळजाभवानी अपंग मतिमंद अनाथ मुलांचे बालगृह व शाळा येथे मान्यवर आणि दानशूर व्यक्तींच्या वतीने सदिच्छा भेट देण्यात आली.

या भेटीदरम्यान, आश्रमवासी मुलांसाठी एक वेळच्या भोजनाचे आयोजन करण्यात आली होती. पोटभर जेवण आणि मिळणाऱ्या आपुलकीच्या प्रेमामुळे मुलांचे चेहरे आनंदाने उजळून निघाले. केवळ जेवणच नाही, तर या मुलांशी मनमोकळा संवाद साधताना त्यांच्यातील जिद्द आणि निरागसता अनुभवायला मिळाली. विद्यार्थ्यांनी आपल्या भावना बोलून दाखवतानाच, त्यांनी आपल्या विविध कला आणि कौशल्यांतून बनवलेल्या विविध साहित्यकृतींचे प्रदर्शनही उपस्थितांना दाखवले. त्यांच्या या कल्पकतेचे सर्वांनी कौतुक केले.

याप्रसंगी आश्रमवासी विद्यार्थ्यांनी बनविलेले पुष्पगुच्छ देऊन उपस्थित पाहुण्यांचा सत्कार केला. विशेष म्हणजे, पाहुणे घरी आल्यानंतर जसा आनंद होतो, तसाच आनंद येथील विद्यार्थ्यांना आम्हाला पाहून झाला होता.

मुलांच्या चेहऱ्यावरील हा आनंद आमच्यासाठी सर्वात मोठी देणगी आहे, अशी भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. या सदिच्छा भेटीमुळे मुलांमध्ये एक नवा उत्साह संचारला असून, त्यांना समाजाचा एक भाग असल्याचा दिलासा मिळाला आहे.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.
Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649